**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.** : नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी.

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये चार प्रस्ताव आलेले आहेत. नियम 289 अन्वये दिल्या जाणाऱ्या सूचनांची संख्या वाढते आहे असे दिसते. तारांकित प्रश्न हे महत्वाचे संसदीय आयुध आहे. प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्याबाबत अशा प्रकारच्या सूचना येणे तितकेसे योग्य होणार नाही असे मला वाटते. अत्यंत महत्वाचा प्रश्न असेल तर जरुर सन्माननीय सदस्यांनी उपस्थित करावा. आज दिवसभरात मी सन्माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय संसदीय कार्यमंत्री तसेच विविध पक्षांचे गटनेते यांच्याशी चर्चा करुन यातून काय मार्ग काढता येईल ते ठरवीन. ज्याप्रमाणे नियम 93 अन्वये दिल्या जाणाऱ्या सूचनांच्या अनुषंगाने मी काही निर्णय दालनातच घेतो व काही निर्णय याठिकाणी प्रस्तुत करतो त्यानुसार याबाबतीत सुध्दा निर्णय घेतला जाईल. काल प्रश्नोत्तराच्या तासातील 27 मिनिटे वाया गेली होती. नंतर प्रश्नोत्तराच्या तासामध्ये वेळ वाढवून घ्यावी लागली. अशा प्रकारे नियम 289 अन्वये सूचना आल्या तर प्रश्नोत्तराच्या तासाला अडचण येण्याची शक्यता आहे. आज नियम 289 अन्वये जे प्रस्ताव देण्यात आलेले आहेत त्यामध्ये वस्तीशाळेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जैनुद्दीन जव्हेरी, जयंत प्र.पाटील आणि दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी यांनी दिले आहेत. वस्तीशाळेच्या अनुषंगाने नियम 93 खाली जी सूचना आली होती त्याबाबतीत मी कालच निर्णय दिला आहे. शासनाने यासंदर्भात निवेदन करावे अशा प्रकारचे निदेश दिले आहेत. वस्तीशाळेचा विषय अत्यंत महत्वाचा आहे असे सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितले होते. मी सुध्दा शासनाने दिवसभरात किंवा आज निवेदन करावे असे निदेश दिले होते. शासनाकडून निवेदन आल्यावर त्यावर चर्चा होईलच. तरीही अशा तऱ्हेचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील आणि रामनाथ मोते यांनी नियम 289 अन्वये दिला आहे. याबाबतीत माझे असे मत आहे की, सन्माननीय सदस्यांनी हा प्रस्ताव मांडू नये असे मला वाटते.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शासनाकडून याविषयावर आजच निवेदन झाले तर प्रस्ताव मांडण्याचा आमचा आग्रह राहणार नाही. अतिशय गंभीर स्वरुपाचा हा प्रश्न आहे. इतक्या मोठया संख्येने मुले शाळेत चालत येत आहेत. तसेच 8000 शिक्षकांना कोणत्याही पगाराविना आणि सेवाशाश्वती न देता टांगत ठेवणे बरोबर होणार नाही. शासनाने ताबडतोब सभागृहात निवेदन करावे अशी माझी विनंती आहे. नंतर श्री.भोगले

**सभापती** : सन्माननीय शालेय शिक्षणमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. या संदर्भात शासनाने आज संपूर्ण दिवसभरात निवेदन करणे जरुरीचे आहे. ज्यावेळी निवेदन केले जाईल त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील व अन्य संबंधित सदस्यांना याबाबत आवश्यक असणारे उपप्रश्न विचारण्यास मी परवानगी देईन.

प्रा.वसंत पुरके : सन्माननीय सभापती महोदय, शासनाची निवेदन करण्याची तयारी आहे. आज नियम 93 अन्वये जी निवेदने पटलावर ठेवली जाणार आहेत, त्या निवेदनांमध्ये या विषयाच्या संदर्भातील निवेदन अनुक्रमांक-1 वर आहे.

**सभापती** : यथायोग्य वेळी निवेदन करण्यास मी अनुमती देत आहे. नियम 289 अन्वये सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी यांनी राज्यातील शेतकऱ्यांना दिली जाणारी कर्जमाफी या संदर्भातील प्रस्ताव दिलेला आहे............

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 289 अन्वये हा प्रस्ताव देण्याची मूळ कारण हेच आहे की, केंद्र शासनाकडून अंदाजपत्रकामध्ये 60 हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीची घोषणा करण्यात आल्यानंतर देखील विदर्भामध्ये जवळपास 26 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सभापती महोदय, काल मूर्तिजापूर तालुक्यामध्ये तहसील कचेरीसमोर एका शेतकऱ्याने विष पिऊन आत्महत्या केली. कर्जमाफीची घोषणा होऊनही शेतकरी आत्महत्या का करीत आहेत? याचे कारण म्हणजे कर्जमाफीच्या घोषणेमध्ये 5 एकरपर्यंत ज्यांची जमीन आहे त्याच शेतकऱ्यांचा समावेश झालेला आहे. विदर्भामध्ये साधारणतः शेतकऱ्यांची शेतजमीन धारणा जास्त आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये ती कमी आहे. विदर्भामध्ये कर्जाचे प्रमाण एकरी 2 ते 2.5 हजारापेक्षा जास्त नाही. कोरडवाहू शेती असल्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांना अधिक कर्ज मिळत नाही. विदर्भातील शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा लाभ कमी मिळणार आहे. म्हणून आम्ही मागणी केली की, राज्यातील सर्वच शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झाली पाहिजे. सभापती महोदय, आघाडी सरकारने जाहीरनाम्यामध्ये शेतकऱ्यांची कर्जमाफी करु अशी घोषणा करुनही फक्त 5 एकरापर्यंतच्या शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर केली आणि उर्वरित शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून दिले.विदर्भामध्ये ज्या 5 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या,ते सर्व शेतकरी 5 एकरापेक्षा जास्त शेतजमीन असणारे शेतकरी आहेत.आता कर्जमाफी मात्र 5 एकरापेक्षा ज्यांची जमीन कमी आहे त्याच शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा

..2..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

मिळणार आहे. कर्जमाफीचे स्पष्ट धोरण शासनाने जाहीर केले नाही, त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या मनामध्ये संभ्रम आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला झालेल्या चहापान कार्यक्रमाच्या वेळी आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती की, राज्यातील जो कोरडवाहू शेतकरी आहे त्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा मिळाला पाहिजे. खरे म्हणजे विदर्भामध्ये शेतकऱ्यांकडील जमिनीचे प्रमाण जास्त असल्यामुळे या कोरडवाहू शेतकऱ्यांची संपूर्ण कजमाफी केली आणि राज्यातील उर्वरित शेतकऱ्यांचा कर्जमाफीचा भार महाराष्ट्र शासनाने उचलला तर निश्चितपणे राज्यातील शेतकरी कर्जातून मुक्त होणार आहे. म्हणून या नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या निमित्ताने माझी मागणी आहे की, यासंबंधी सर्वंकष चर्चा सभागृहात झाली पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नासंबंधी महाराष्ट्र शासनाचे धोरण जाहीर केले पाहिजे. केंद्र सरकारने जरी कर्जमाफी देण्यासाठी 5 एकरापर्यंतची मर्यादा घालून दिलेली असली तरी 5 एकरावरील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने खर्चाचा वाटा उचलावा आणि त्यासंबंधीचे सुस्पष्ट धोरण या सभागृहामध्ये तातडीने जाहीर करावे, अन्यथा आत्महत्यांचे प्रमाण वाढत जाणार आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .......

आणि कर्जमाफी जी केली आहे त्याचा फक्त पाच एकर क्षेत्र धारण केलेल्या शेतकऱ्यांनाच फायदा झ ालेला आहे. म्हणून उर्वरित शेतकऱ्यांना देखील कर्जमाफी केली पाहिजे, असे धोरण शासनाने आखले पाहिजे. यासाठी या सभागृहातील सर्व कामकाज बाजुला ठेवून याच विषयावर सर्वंकष चर्चा झाली पाहिजे, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

श्री. दिवाकर रावते : माननीय विरोधी पक्षनेते तसेच आमच्या सर्व सदस्यांच्या वतीने सभागृहासमोरील कामकाज तहकूब करुन कर्जमाफी करण्यासंबंधीच्या विषयावर सभागृहात चर्चा घडवून आणावी असा आग्रह धरला आहे, त्या प्रस्तावाचे मी समर्थन करीत आहे. महोदय, कर्जमाफी व्हायला पाहिजे म्हणून सुरुवातीला "मीच आणि मीच" म्हणून म्हणणारे नेतेही या कर्जमाफीमुळे व्याकूळ आहेत, माननीय मुख्यमंत्र्यांनी अहमदनगर जिल्ह्यामध्ये आवतन दिले की, या राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे ते मुख्यमंत्री सुध्दा अस्वस्थ आहेत, म्हणून या विषयावर चर्चा झाली पाहिजे, सावकारांचे काय करायचे आणि मी काही करु शकत नाही म्हणून हतबल झालेले माननीय गृहमंत्री आज व्याकूळ आहेत म्हणून चर्चा झाली पाहिजे, पोरगा कोणाला झ ाला आणि पेढे कोण वाटते म्हणून कोण व्याकूळ आहे, त्याकरिता ही चर्चा झाली पाहिजे. हे सर्व होत असताना आत्महत्त्या मात्र थांबत नाहीत तर त्या पुन्हा चालूच राहिल्या आहेत, त्यासाठी संपूर्ण राज्यातील राज्यकर्ते व्याकूळ आहेत म्हणूनही या सभागृहात तातडीने चर्चा झाली पाहिजे. एखादा चांगला निर्णय झाल्यानंतर पानेच्या पाने जाहिरात दिल्यानंतर सुध्दा आनंद साजरा करता येत नसेल तर राज्यातील तमाम शेतकरी कोणत्या उंबरठयावर उभा राहिला आहे यासाठी ही चर्चा घडवून आणणे आवश्यक आहे आणि आम्ही सर्वांनी मिळून कोणासाठी कोण काय करतो यापेक्षा या सर्वांना काय वाटते या भावना व्यक्त करुन निश्चित स्वरुपात कोण तिजोरी उघडणार आहे, कोण पैसा ओतणार आहे यासाठी ही चर्चा झाली पाहिजे. कारण आमचा शेतकरी आज मरणाच्या उंबरठयावर उभा आहे आणि तो वाट पाहतो आहे की, माझ्यासमोर पुढचे ताट काय वाढलेले आहे. म्हणून राजकीय डावपेचात हा प्रश्न न फसता, मग राज्यात माननीय सोनिया गांधी येतील, माननीय पंतप्रधान येतील अथवा माननीय कृषी मंत्री येतील आणि भविष्यात काय देतील हे सर्व होण्यापेक्षा शेतकऱ्यांना निश्चित स्वरुपात याबाबतीत आश्वासन मिळाले पाहिजे. कारण राज्यातील जाणाऱ्या

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

प्रत्येक शेतकऱ्याचा जीव लाख मोलाचा आहे असे मानून ही चर्चा झाली पाहिजे. म्हणून माझी आपल्या माध्यमातून अशी विनंती आहे की, हा विषय एकदम गंभीर आहे, आत्महत्त्यांचा विषय जेवढा गंभीर होता तेवढाच गंभीर विषय आता कर्जमुक्तीनंतर निर्माण झालेला आहे. म्हणून सभागृहासमोरील सर्व कामकाज तातडीने तहकूब करावे व यासंबंधीची चर्चा घडवून आणावी आणि चर्चेच्या दरम्यान आम्हाला आमचे विस्तृत विचार मांडता येतील. सर्वात महत्वाचे म्हणजे राज्याच्या गृहमंत्र्यांनी घोषणा करताना आव्हान दिले आहे की, "या मैदानात, मी काय बोलतो, कोण किती बोलतो ते पाहू" या सर्व प्रश्नांची शहानिशा झाली पाहिजे म्हणून सर्व कामकाज ताडीने तहकूब करुन यासंबंधीची चर्चा झाली पाहिजे. आमची प्रामाणिक इच्छा आहे की, गोंधळ घालून कामकाज बंद पाडण्याची वेळ येऊ नये व यासंबंधीची चर्चा घडवून आणावी, अशी विनंती करतो.

प्रा. बी.टी.देशमुख : महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयाच्या बाबतीत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, सबंध देशात डिस्ट्रेसमध्ये असलेले जिल्हे फाइंड आऊट करण्यासाठी माननीय पंतप्रधानांनी समिती नेमली होती. त्या समितीने दिलेल्या रिपोर्टमध्ये 31 जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उपजिविकेच्या साधनांवर कमालीचा तणाव आलेला आहे. दुर्देवाने त्यातील 6 जिल्हे महाराष्ट्रातील आहेत. माननीय पंतप्रधानांनी स्वत: येऊन या 6 जिल्ह्यांसाठी एक पॅकेज जाहीर केले आणि या जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज माफ करण्यात आले. त्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी जोरदार समर्थन केले व त्याची कारणे अशी अशी आहेत. व्याज माफ करतांना डिस्ट्रेसमध्ये असलेल्या 6 जिल्ह्यांना करण्यात आले आणि कर्जमाफी करतांना ज्या कसोटया लावल्या आहेत, विकसित जिल्ह्यांमध्ये कर्जमाफी नाही, याचे दु:ख नाही......

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख....

या डिस्ट्रेस्ड जिल्हयामध्ये असलेले किती तरी शेतकरी केंद्रशासनाच्या कर्जमुक्तीच्या घोषणेत सुटून गेलेले आहेत त्यामुळे या गंभीर विषयावर चर्चा होण्याची नितांत आवश्यकता आहे. तांत्रिक विषयात न शिरता महाराष्ट्रातील सर्व शेतक-यांना शासनाने कर्जमुक्ती दिली पाहिजे. केंद्रशासनाने शेतक-यांचे कर्जावरील व्याज माफ करतांना जे धोरण होते त्या धोरणात आता आमूलाग्र बदल झालेला आहे. त्यामुळे शेतक-यांचे कर्ज माफ करतांना या सभागृहात चर्चा होण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये जी विनंती केलेली आहे ती मान्य करावी व या विषयावर प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून चर्चा घडवून आणावी अशी विनंती आहे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, 1 मार्च नंतर शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या जातील असा शब्द जबाबदार राज्यकर्त्यांकडून वापरला गेलेला आहे. केंद्र शासनाने शेतक-यांच्या कर्जमाफीची घोषणा केलेली असतांना देशातील शेतक-यांच्या आत्महत्या काही थांबल्या नाहीत. कर्जमाफी देऊन सुध्दा शेतक-यांच्या आत्महत्या न थांबण्याचे कारण काय आहे याचे कारण सभागृहाला समजण्याची आवश्यकता आहे. गेली 60 वर्षे शेतक-यांच्या संदर्भात या देशामध्ये जी व्यवस्था लादण्यात आलेली असल्यामुळे त्याचा परिणाम या देशातील शेतक-यांवर झालेला आहे. या ठिकाणी आदरणीय विरोधी पक्ष नेत्यांनी अतिशय महत्वाचा ठराव या ठिकाणी मांडलेला असल्यामुळे सर्व चर्चा बाजूला ठेवून, शेतक-यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात या सभागृहात चर्चा करण्याची गरज आहे. ज्यावेळेस मंडल आयोगाच्या संदर्भात दिल्लीमध्ये आंदोलन झाले होते त्या आंदोलनात 3 व्यक्तींनी आत्महत्या केल्या होत्या. तीन व्यक्तींनी आत्महत्या केल्यामुळे देशातील सरकार पडले होते. 3 लोक मेल्यानंतर देशाचे सरकार पडते परंतु एकीकडे रोज शेतकरी मरत असतांना केंद्रसरकारला काही होत नाही, राज्यसरकारला काही होत नाही, हसणे, भाषणे सर्व काही सुरु आहे. त्यामुळे माझी आपल्या मार्फत सरकारला एक विनंती आहे की, शेतक-यांच्या आत्महत्येच्या मानसिकतेचे मूळ शोधणे गरजेचे आहे. त्यामुळे काहीही विलंब न करता ताडीने शेतक-यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात सुरुवात करावी अशी मी आपणास विनंती करतो.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, या ठिकाणी विरोधी पक्ष नेते माननीय फुंडकर साहेबांनी नियम 289 अन्वये सगळया चर्चा बाजूला ठेवून शेतक-यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात चर्चा घडवून आणावी यासाठी ठराव मांडलेला आहे. शेतक-यांच्या आत्महत्या तसेच शेतक-यांचे कर्जमाफ करण्यासाठी केंद्रशासनाने 60 हजार कोटी रुपये माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे हा निर्णय 50-60 वर्षामधील ऐतिहासिक निर्णय आहे हे आपल्या सर्वांनी मान्य केले पाहिजे. केंद्रशासन एवढया मोठया प्रमाणात शेतक-यांचे कर्ज माफ करेल अशी अपेक्षा आम्ही सुध्दा ठेवली नव्हती तसेच शेतक-यांनी सुध्दा एवढया मोठया प्रमाणात कर्ज माफ होईल अशी अपेक्षा ठेवली नव्हती. केंद्रशासनाने शेतक-यांचे जे कर्ज माफ केलेले आहे त्यामध्ये काही त्रुटी आहेत. केंद्रशासनाचया त्रुटी माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्रशासनाच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. या त्रुटींमध्ये जिरायत शेतक-यांचा प्रश्न आहे, नियमितपणे कर्ज भरणा-यांचा प्रश्न आहे. ज्यावेळेस पुन्हा लोकसभेचे अधिवेशन सुरु होईल त्यावेळेस या विषयावर त्या ठिकाणी निश्चितपणे चर्चा होऊन अजून काही वेगळे निर्णय होणे अपेक्षित आहे. केंद्रशासनाचे निर्णय अपेक्षित असतांना कर्जमाफीच्या संदर्भात राज्यसरकारला सुध्दा निर्णय घ्यावेच लागणार आहेत. केंद्रशासन कर्जमाफीच्या संदर्भात काय निर्णय घेते हे पाहून त्यानंतर राज्यशासनाला निश्चितपणे निर्णय घ्यावाच लागणार आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात सर्वांनीच थोडी कळ काढली तर राज्यसरकारला यासंदर्भात निर्णय घेणे सोपे जाईल त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की, केंद्राने कर्जमाफीच्या संदर्भात अजून निर्णय घेतल्यानंतर राज्यशासनाने यासंदर्भात चर्चा करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. विलासराव देशमुख ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, केंद्रसरकारने शेतक-यांच्या संदर्भात ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे. केंद्रशासनाच्या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत झालेले आहे. कोणताही निर्णय घेतांना त्यामध्ये काही त्रुटी राहणे साहजिक आहे, त्यामध्ये वेगळे काही घडले असे मी मानत नाही. मराठवाडा आणि विदर्भातील जिरायत शेतक-यांकडे 5 एकराच्या पुढे जमिनी असतात. मराठवाडा आणि विदर्भातील जिराईत शेतकरी सर्व केंद्रशासनाच्या निर्णयामुळे

....3





श्री. विलासराव देशमुख ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वंचित राहतो आहे. ज्यांच्याकडे ओलिताखालील क्षेत्र आहे त्यांचे अधिक प्रमाणात कर्ज माफ होत आहेत. क्षेत्र जास्त असल्यामुळे जिरायत शेतक-याचे कर्ज माफ होत नाही अशी विसंगती निर्माण झालेली आहे. ही बाब आम्ही केंद्रशासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे व यासंदर्भातील पत्र मी माननीय पंतप्रधानांना तसेच केंद्रीय अर्थमंत्र्यांना लिहिलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 12.20

श्री.विलासराव देशमुख ..

या संदर्भातील केन्द्र सरकारचा अंतिम आदेश पारित होणार आहे. तत्पूर्वी याचा विचार करावा असे आम्ही त्यांना सुचवलेले आहे. राज्य सरकारची या संबंधी काय भूमिका आहे ती लगेच जाहीर करावी असे विरोधी पक्ष नेत्यांनी म्हणणे मांडलेले आहे. परंतु या संदर्भात घाई करण्याचे कारण आहे असे मला वाटत नाही. केन्द्र सरकारचा अंतिम निर्णय जाहीर झाल्यानंतर मग राज्य सरकारला कोणती जबाबदारी उचलावी लागेल किंवा लागणार आहे याचा आपल्याला विचार करता येईल. या बाबतीत मागेच सांगण्यात आले होते की, केन्द्र सरकारने आपली भूमिका घेतल्यानंतर जी काही जबाबदारी राज्य सरकारवर येईल ती उचलण्यास राज्य सरकार तयार आहे. नागपूरच्या अधिवेशनात या सबंधीचे वक्तव्य सदनामध्ये करण्यात आले होते. माझी विरोधी पक्ष नेत्यांना विनंती आहे की, या विषयावर चर्चा करण्यास काही अडचण नाही. हा विषय काही नवीन नाही. या पूर्वी या विषयावर चर्चा घडली नाही असेही नाही. या विषयावर केव्हाही चर्चा करता येईल तेव्हा या चर्चेची वेळ आपण ठरवावी. परंतु आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित ठेवता कामा नये कारण सन्माननीय सदस्य 30 दिवस अगोदर प्रश्न देत असतात आणि त्या प्रश्नासंबधी आपण माहिती मागवत असतो. तेव्हा प्रश्नोत्तरे हा सुध्दा सदनातील कामकाजाचा महत्वाचा भाग आहे. अर्थात शेतकऱ्यांच्या कर्ज माफीचा विषय देखील महत्वाचा आहे याबद्दल कोणाच्याही मनात दुमत नाही. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्याच भावना सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या आहेत. हा विषय राजकीय असू शकत नाही. दोघांनी मिळून या विषयाच्या संदर्भात कसा चांगला न्याय देता येईल यासाठी एकत्रितपणे बसून विचार केला पाहिजे. केवळ राजकीय दृष्टया एकमेकावर कुरघोडी करण्याचा जो प्रयत्न असतो तो बाजूला ठेवण्यात यावा. शेती व शेतकरी यांना न्याय दृष्टीने विचार करावा.

एक सन्माननीय सदस्य ( बसून ) : आपआपसात कुरघोडी केली जात आहे

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मी तो भाग सांगत नाही परंतु ज्यांनी कर्ज माफ केलेले आहे. त्यांना कर्ज माफ केले आहे असे म्हणावेच लागेल. तुम्ही फक्त मागण्याचेच काम करीत आहात. परंतु देणारे मात्र आम्हीच आहोत. त्यामुळे जो देतो त्याला त्याबद्दल सांगावेच लागेल. यु.पी.ए. सरकारचा हा निर्णय असून त्याच्यामध्ये अनेक घटक पक्षाचा सहभाग आहे. केवळ मागणी मांडून हा प्रश्न सुटणार नाही तर त्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन जो

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख ....

निर्णय करणारा असतो त्याच्याकडे हे श्रेय जातेच. त्यामुळे आपण हे श्रेय त्यांना दिले नाही तरी जनता निश्चितपणे हे श्रेय त्यांना देईल. परंतु हा श्रेयाचा प्रश्न नाही . या योजनेमध्ये ज्या काही त्रृटी राहिलेल्या आहेत त्या संबधी अवश्य चर्चा झाली पाहिजे. प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर तातडीने चर्चा झाली पाहिजे असे विरोधी पक्ष नेत्यांनी म्हणणे मांडलेले आहे. तेव्हा त्या बाबतीत आपण निर्णय घ्यावा. या संबंधी विरोधी पक्ष नेत्यांना आणि आम्हाला चर्चेसाठी बोलविण्यात यावे आणि या चर्चेसाठी किती वेळ हवा आहे आणि चर्चा कधी करावयाची हे ठरविण्यात यावे. या विषयासंबंधी चर्चा करण्याची राज्य सरकारची तयारी आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विषयासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी आता खुलासा केलेला आहे आणि या विषयाला महत्व दिलेले आहे. हे अधिवेशन दीड महिना चालणार आहे. तेव्हा आजचा प्रश्नोत्तराचा तास उद्यावर ढकलण्यात आला तर काहीही बिघडणार नाही. महाराष्ट्रातील अन्नदाता शेतकऱ्याच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्वाचा असून मराठवाडा आणि विदर्भातील जिरायत शेतक-यावर अन्याय झालेला आहे हे माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केलेले आहे. तेव्हा या विषयातील बारकावे समोर येणे आवश्यक आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडल्यानंतर आपल्याला केन्द्र सरकार समोर व्यवस्थितपणे प्रस्ताव मांडता येईल. प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याचे प्रकार यापूर्वी अनेकदा सभागृहामध्ये घडलेले आहेत. प्रश्नोत्तराचा तास बाजूला सारुन या प्रस्तावावर अनेकदा चर्चा झालेली आहे. हा प्रस्ताव अतिशय महत्वाचा आहे. तेव्हा प्रश्नोत्तराचा तास स्थगित ठेवून या प्रस्तावावर चर्चा घडवून आणावी तरच महाराष्ट्रातील शेतक-याला या सदनामध्ये न्याय दिल्या सारखे होईल. प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या प्रस्तावावर ताबडतोबीने चर्चा घ्यावी अशी आमची आग्रहाची मागणी आहे तेव्हा ही मागणी मान्य करावी अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही नियम 289 खाली जो प्रस्ताव दिलेला आहे त्या संबंधातील विश्लेषण माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी केलेले आहे. हा ठराव आज आणि आताच चर्चेला घेणे का महत्त्वाचे आहे याबाबतही त्यांनी पूर्ण विश्लेषण केलेले आहे. त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांची जी भूमिका मांडली आहे तीही आम्ही ऐकली आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची केलेली घोषणा आणि तरीही शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या हा आज महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत ज्वलंत असा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याच्या बातम्या रोजच येत आहेत आणि या बातम्यांनी माणसे व्यथित होत आहेत. सभापती महोदय, विधीमंडळाचे अधिवेशन सुरू होऊन आज तिसरा दिवस आहे आणि असे असताना ज्या सभागृहामध्ये राज्यातील सर्व सामान्यांच्या व्यथा मांडावयाच्या असतात, त्यावर चर्चा करून मार्ग काढावयाचा असतो त्या सदनामध्ये तातडीने त्यांच्या प्रश्नावर चर्चा व्हावी ही अपेक्षा आमचीच नाही तर सर्वांचीच आहे. असे असताना त्यासाठी वेळ ठरवून घेऊन नंतर चर्चा करू अशी भूमिका मांडली गेली तर ते योग्य नाही. सभापती महोदय, आपण स्वतःही शेतकरी कुटुंबातीलच आहात आणि येथील बहुतांश सदस्य हे शेतकरी कुटुंबातून आलेले आहेत. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आज प्रश्नोत्तराचा तास स्थगित ठेवून आम्ही नियम 289 खाली दिलेल्या या प्रस्तावावर आपण तातडीने चर्चा घडवून आणावी. सभागृहातील प्रश्नोत्तराचा तास किती महत्त्वाचा आहे याची आपणा सर्वांनाच कल्पना आहे, माहिती आहे. या तासामध्ये राज्यातील सर्वसामान्यांचेच महत्त्वाचे प्रश्न येथे चर्चिले जात असतात हे कोणीही नाकबूल करणार नाही. आज देखील यामध्ये पहिला प्रश्न हा आमच्याच एका सदस्याचा आहे पण तरीही आम्ही आपल्याला सांगू इच्छितो की, नियम 289 खालील प्रस्ताव स्वीकारून आपण तातडीने ही चर्चा घडवून आणावी. जेणे करून साऱ्या महाराष्ट्रात हा मेसेज जाईल की, येथील सर्व लोकप्रतिनिधी हे जागरूक आहेत. यामध्ये केवळ श्रेय घेण्यासाठी आमची ही लढाई चाललेली नाही. किंबहुना तो भाग बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या या महत्त्वाच्या प्रश्नावर आम्ही येथे चर्चा करू इच्छितो. त्यातून कर्जमाफी देण्याची घोषणा केली असताही शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या होत आहेत त्यामागील कारणे कोणती आहेत हे शोधणे सहजशक्य आहे. त्यासाठी आपण तातडीने नियम 289 खालील प्रस्ताव स्वीकारून चर्चेला सुरूवात करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

...... एफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेता, त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, श्री.मधुकर सरपोतदार, श्री.पाशा पटेल, श्री.यशवंतराव गडाख आणि त्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी एका अत्यंत महत्त्वाच्या, जिव्हाळ्याच्या या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपले मत मांडले आहे, भाष्य केले आहे. आता या प्रश्नाच्या अनुषंगाने निर्णय घेत असताना मी स्वत: तांत्रिक पद्धतीचा आधार घेणे योग्य होईल असे मला वाटत नाही. परंतु त्याचबरोबर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने कर्जमाफीचा निर्णय हा खऱ्या अर्थाने एक क्रांतिकारक निर्णय म्हणावा लागेल. हा प्रस्ताव तातडीने येथे चर्चेला यावा म्हणून आपण मागणी केलेली आहे आणि त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी जे विचार मांडले आहेत त्यामध्ये यत्किंचितही मला फरक वाटत नाही. आज माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला पहिला दिवस आहे आणि उद्या दुसरा दिवसत आहे. संकेत म्हणा किंवा अन्य पद्धतीप्रमाणे म्हणा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचा प्रस्ताव आपल्या कार्यक्रम पत्रिकेवर असताना तो त्या पद्धतीनेच होणे गरजेचे आहे असे मला वाटते. माननीय संसदीय कार्य मंत्री, माननीय विरोधी पक्षनेते यांना मी माझ्या दालनामध्ये बोलावून घेऊन या विषयावर नियम 97 खाली चर्चा कधी घ्यायची याचा निर्णय मी जरूर घेईन. चर्चा कोणत्या पद्धतीने द्यायची तो निर्णय माझा आहे म्हणून माझी इच्छा अशी आहे की, नियम 289 च्या अनुषंगाने कामकाज पत्रिकेवर आज हा विषय नसला तरी अपवाद म्हणून या विषयावर आजच चर्चा व्हावी ही जी मागणी आहे ती मान्य करणे गरजेचे आहे. मात्र ही मागणी मान्य होत असताना या चर्चेसाठी वेळ ठरविण्यासाठी मी माझ्या दालनामध्ये संसदीय कार्य मंत्री, विरोधी पक्षनेते, गटनेते यांना बोलावतो आणि ही चर्चा तातडीने कशी घेता येईल या दृष्टीने ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी दुसरा कोणताही महत्त्वाचा प्रश्न नाही. आज राज्यामध्ये जो प्रश्न ऐरणीवर आलेला आहे, राज्यातील जवळपास 32 लाख शेतकरी या कर्जमाफीपासून वंचित झालेला आहे, एवढा महत्त्वाचा प्रश्न असल्याने या प्रश्नावर नंतर वेळ देऊन चर्चा करणे हे बरोबर नाही. म्हणून आजच, आताच ही चर्चा झाली पाहिजे. त्यासाठी आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून ही चर्चा झाली पाहिजे. 60 कोटीची कर्जफेड झाली पाहिजे, पण यामध्ये शेतकऱ्यांचा कोठेही उल्लेख नाही. केंद्रीय कृषी मंत्री सांगतात की, सावकारांचे कर्ज फेडू नका. ...

( यानंतर श्री. सरफरे ....जी 1 ...

12-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G 1



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

आणि राज्याचे माननीय गृहमंत्री सांगतात की, 15 दिवसाच्या आत सर्व सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी परत केल्या पाहिजेत. एवढयाच फक्त घोषणा झाल्या आहेत. प्रत्यक्षात शेतकऱ्याच्या पदरात लाभ पडत नाही. त्याकरिता प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन आत्ताच चर्चा सुरु करावी अशी पुन्हा एकदा आग्रहाची विनंती करतो.

**सभापती** : याबाबत निर्णय घेण्यासाठी माननीय संसदीय कार्यमंत्री आणि माननीय विरोधी पक्षनेते यांचेबरोबर चर्चा करण्यासाठी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी ठीक 12.30 वाजता स्थगित करण्यात आली.)

-----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**<u>सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)</u>**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक पुन्हा 20 मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.40 ते 1.00 वाजेपर्यंत तहकूब झाली.)

-----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.00 ते 1.15 पर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>**

**उपसभापती** : प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ संपलेली असल्यामुळे मी पुढील कामकाज घेतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : कामकाज सुरु करण्यापूर्वी तुम्ही आमचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. आम्ही अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा मागितली आहे. ही चर्चा न देता आपण कामकाज सुरु करीत आहात. शेतक-यांचा प्रश्न हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. काल एका शेतक-याने आत्महत्या केली. माणसे मरत आहेत. असे असताना देखील 289 अन्वयेच्या प्रस्तावाला आपण मान्यता देत नाही हे इष्ट वाटत नाही. कामकाज दाबून नेण्याचा सरकारी पक्षाचा प्रयत्न चाललेला असेल तर आम्ही या कामकाजावर आज बहिष्कार टाकू हे मी आताच आपणास सांगतो.

**उपसभापती** : आपल्या भावना लक्षात घेऊन मी आपणाला एवढेच सांगतो की, आपण मांडलेला विषय हा महत्वाचा आहे हे मीही जाणतो. आपण हा विषय कामकाज सल्लागार समितीपुढे घेऊन या विषयावरील चर्चेचा कालखंड ठरवू आणि पध्दतशीररीत्या या विषयावर चर्चा करु. आपल्या भावनांशी कोणीही असहमत नाही.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या सदनाचे कामकाज नेहमीच सहमतीने चालते. कामकाज व्यवस्थित चालण्यासाठी आपण नियम केलेले आहेत. प्रत्येक कामकाजासाठी दिवस ठरविलेले आहेत. शेतक-यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी राज्यपालांचे अभिभाषण हे एक चांगले आयुध आज सगळया सदनाला उपलब्ध आहे. राज्यपालांच्या अभिभाषणाची सुरुवात सुध्दा शेतक-यांना दिल्या जाणा-या मदतीच्या संदर्भात आहे केन्द्र सरकारने घेतलेल्या भूमिकेच्या संदर्भात आहे. सन्माननीय सदस्य माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना या विषयावर आपली मते मांडू शकतात. त्याच बरोबर केन्द्र सरकारने शेतक-यांना मदत करण्याच्या संदर्भात ज्या भूमिका घेतलेल्या आहेत त्यात सुस्पष्टता आल्यानंतर आपलेही म्हणणे ऐकून घेऊ आणि राज्य सरकार त्यामध्ये काही भर घालू शकेल काय तेही पाहू. हे 7 आठवडयाचे अधिवेशन आहे. आत्महत्येकडे शासन दुर्लक्ष करणार आहे अशातला कोणताही भाग नाही. सभापती महोदय, आज आणि उद्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा घ्यावी. आवश्यकता असेल तर आपण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KTG/

(श्री. आर.आर.पाटील....

कामकाज सल्लागार समितीची बैठक बोलावू, चर्चेची वेळ निश्चित करु. माननीय विरोधी पक्षनेत्यानी बहिष्काराची घेतलेली भूमिका मला तरी योग्य वाटत नाही. या विषयावर बोलायला विरोधी पक्षाला संधीच नसती तर आपले मत ठीक होते. परंतु बोलण्याची संधी असताना सुध्दा अशा प्रकारची भूमिका घेऊ नये अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी सांगितले की, राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करण्याची संधी आहे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये संपूर्ण राज्याच्या धोरणासंबंधीचे विषय आहेत. त्यामुळे त्यावर प्रामुख्याने शेतक-यांच्या प्रश्नाविषयी चर्चा होऊ शकत नाही. त्या अभिभाषणामध्ये शेतक-यासंबंधी एखादा मुद्दा असेल आणि उर्वरित अभिभाषण राज्याच्या सर्व प्रश्नासंबंधी असेल तर मग त्यातून शेतक-याला न्याय मिळणार नाही. तसेच आपण केन्द्र सरकारला जो प्रस्ताव पाठविणार आहात त्याबाबतीत या सदनातील सन्माननीय सदस्यांचे अभिमत लक्षात घ्यावे, तसेच केन्द्र सरकारने महाराष्ट्राच्या संदर्भात एक सर्वंकष धोरण घ्यावे अशा प्रकारची आमची भूमिका आहे. महाराष्ट्रातील 32 लाख शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले आहेत. त्यांचाही विचार झाला पाहिजे. म्हणून या विषयावर सर्वंकष अशी चर्चा झाल्यानंतर महाराष्ट्राने आपले मत केन्द्र सरकारकडे पाठविले तरच केन्द्राकडून न्याय मिळण्याची शक्यता आहे. म्हणून ही चर्चा घेण्यासंबंधी आमचा आग्रह आहे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 100 मुद्दे आहेत. त्यामधून शेतक-याला न्याय मिळणार नाही. म्हणून स्पेसिफिक शेतक-यांच्या प्रश्नावरच चर्चा व्हावी असा आमचा आग्रह आहे. म्हणून सरकारने या चर्चेला मान्यता द्यावी. सभापती महोदय, आम्ही संकेत मोडायला तयार नाही. शेतक-याच्या कर्जमुक्तीबाबत अडीच तास चर्चा झाल्यानंतर राज्यपालांचे अभिभाषण सुरु करावे एवढेच आमचे म्हणणे आहे. आम्ही राज्यपालांच्या अभिभाषणाला विरोध करतो किंवा संकेताला विरोध करतो अशातला भाग नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये आपण 289 अन्वयेच्या प्रस्तावाची कधीच चर्चा केलेली नाही. म्हणून माझी आग्रहाची विनंती आहे की, सभागृहापुढील आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन शेतक-याच्या प्रश्नाला प्राधान्य द्यावे.

....नंतर श्री. गिते...

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री. शिगम 13:20

**उपसभापती** : यासंदर्भात मी माझा निर्णय देत आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या त्या भावना मी समजून घेतल्या आहेत. राज्यातील शेतक-यांचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे याची मला देखील कल्पना आहे. या महत्वपूर्ण विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासंदर्भात कामकाज सल्लागार समितीची बैठक घेण्यात येईल त्यावेळी हा विषय सभागृहात कोणत्या दिवशी घ्यावयाचा व त्यासाठी किती वेळ द्यावयाचा यांसंबंधीची चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

---------------

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देत असतात. )

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेच्या सन 2007 च्या तिस-या अधिवेशनात दिनांक 19 नोव्हेंबर, 2007 ते दिनांक 1 डिसेंबर, 2007 या कालावधीत माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 528 आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी. )

---------

के- 2 (ए).....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांवरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीची विवरणपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 1986 चे पहिले अधिवेशन ते सन 2007 चे दुसरे अधिवेशन या कालावधीत देण्यात आलेल्या 1269 आश्वासनांवरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीची विवरणपत्रे मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : कार्यवाहीच्या माहितीची विवरणपत्रे सभागृहासमोर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : कृपया येथे सोबतची विवरणपत्रे छापावीत. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री. शिगम 13:20

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकाच्या संदर्भातील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री. हसन मुश्रीफ ( विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्रीमती नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांच्या " सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 18- फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2006 " या अशासकीय विधेयकावरील चर्चेच्यावेळी दिनांक 20 जुलै, 2006 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो..

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी. )

--------

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती.

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " ठाणे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामध्ये नोंदणी केलेल्या बेरोजगारांना रोजगाराची एकही संधी केंद्रातर्फे न मिळणे" या विषयावरील सर्वश्री अरुण गुजराथी व इतर वि. प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक 13 एप्रिल, 2007 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी. )

-------------

5......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री. शिगम 13:20

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील, प्रा. शरद पाटील यांनी " अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) रेवदंडा येथील आंग्रेनगरमध्ये सन 1965-66 सालापासून सुमारे 175 झ ोपडपट्टीवासीय वास्तव्यास असून त्यांना घराचे असेसमेंट, उतारा देणे, त्यांचेकडून घरपट्टी व इतर कर कायदेशीररित्या वसूल करुनही उक्त झोपडपट्टीवासियांच्या झोपडया हटविण्याची कारवाई करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर यांनी " सावित्रीबाई फुले विद्यानिकेतन हायस्कुल, चेंबूर व्यवस्थापनाबद्दलच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारीची चौकशी 14 डिसेंबर, 2004 रोजी सभागृहात आश्वासन देऊनही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी "मोर्शी
(जि.अमरावती) नगरपरिषदेचे पदाधिकारी व अधिकारी यांनी संगनमत करुन मोर्शी जकात नाक्यासाठी राखीव असलेले ऑफीस, गोडाऊन व आतील खुली जागा दीर्घ मुदतीने भाडयाने देण्यासाठी जाहिरात देऊन निविदा न मागविता नाममात्र भाडे आकारुन नगरपालिकेला न कळविता गुपचुप 30 वर्षांच्या भाडेपट्टयाने देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, परशुराम उपरकर, डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत, ॲड, अनिल परब यांनी " दिनांक 3 मार्च, 2008 रोजी शिवसेनेच्या महिला पदाधिका-यांचे शिष्टमंडळ घेऊन मालवण तहसिलदारांना निवेदन देण्यात जात असताना श्री. गजानन मातोंडकर या पोलीस उप निरीक्षकाने श्री. परशुराम उपरकर, वि. प.स. यांना अडवून तहसिलदारांना भेटण्यास केलेला मज्जाव, त्यांना केलेली

6....

उपसभापती....

धक्काबुक्की, शिवीगाळ व वापरलेली उर्मट भाषा यासंबंधात शिवसेना कार्यकत्यांनी शासकीय कार्यालयासमोर सुरु केलेले उपोषण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी " सिंधुदूर्ग जिल्हयात प्रशासकीय अधिका-यांनी पोल्ट्रीधारक यांच्या संगनमताने खोटे पंचनामे करुन लाखो रुपयांची केलेली लूट, या गैरप्रकारांची चौकशी करुन संबंधितांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन पशुसंवर्धन राज्यमंत्री यांनी सभागृहात देऊनही कारवाई न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे,प्रा. बी,टी,देशमुख यांनी " अंजनाबाई वासनिक मतिमंद मुला-मुलींची निवासी शाळा व राजीव गांधी मुकबधीर निवासी विद्यालय, कांद्रीकन्हान ( ता, पारशिवनी) जिल्हा नागपूर या अपंग विद्यार्थ्यांच्या शाळेतील 28 शिक्षक कर्मचा-यांचे माहे जुलै, 2007 पासूनचे वेतन प्रलंबित असण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, पाशा पटेल, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर, सागर मेघे यांनी " दहावीच्या बिजगणित, भूमिती, इंग्रजी आणि विज्ञान पुस्तकातील चुकांबाबत मंडळाने दुरुस्ती पुरवणी पुस्तिका विलंबाने काढल्यामुळे विद्यार्थ्यांची अभ्यासाबाबत झालेली कुचंबणा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी " कोकणातील विशाल समुद्रकिनारा व तेथे मिळणारी मासळी यावर संशोधन व तांत्रिक मार्गदर्शन मिळण्यासाठी कोकणामध्ये मत्स्यव्यवसायाचे शिक्षण देणारे विद्यापीठ स्थापन करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये

7....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ, नीलम गोऱ्हे यांनी " दिनांक 11 मार्च, 2008 रोजी पुण्यात शनिवार वाडयाजवळ सायकलवरुन शाळेत जाणारा विद्यार्थी अर्थर्व दीपक डोंगरे याला पी.एम.पी.एल.च्या बसने धडक दिल्याने जागीच ठार झाल्यामुळे चिडलेल्या नागरिकांनी बसेसवर दगडफेक केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण यांनी " दिनांक 26 जुलै, 2005 च्या अतिवृष्टीमुळे वालधुनी नदीस महापूर येऊन कल्याण, बदलापूर,उल्हासनगर, अंबरनाथ या शहराचे नुकसान होणे, यावर उपाय म्हणून मेरी या संस्थेमार्फत वालधुनी नदीचे सर्वेक्षण करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री संजय केळकर, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते यांनी " ठाणे जिल्हयातील कल्याण तालुक्यात जिल्हा परिषदेच्या 103 शाळांमध्ये सुमारे 8 हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून या विद्यार्थ्यांचे पेपर्स, प्रश्नपत्रिका तयार करणारी समिती गट शिक्षणाधिकारी यांनी स्थापन न करणे, विद्यार्थ्यांना गत वर्षीच्याच प्रश्नपत्रिका जसेच्या तसे तारखा बदलून देण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "सन 2006-07 या वर्षात खराब हवामानामुळे आंबा उत्पादक शेतक-यांच्या झालेल्या नुकसानापोटी शासनाने 15 हजार रुपये प्रति हेक्टरी नुकसान भरपाई देण्याचे जाहीर करणे, परंतु आंबा उत्पादकांना प्रत्यक्षात हेक्टरी 9 ह जार रुपये दिल्याचे आढळून येणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-------- 8....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पोलीस विभागातील मृत कर्मचा-यांच्या वारसांना अद्यापपर्यंत नोकरीत सामावून न घेणे

**मु.शी.** : पोलीस विभागातील मृत कर्मचा-यांच्या वारसांना अद्यापपर्यंत नोकरीत सामावून न घेणे यासंबंधी श्री. राजन तेली यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

..........

**पृ.शी.** : शालेय मध्यान्ह भोजनाच्या कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांना तांदूळ वेळेवर न पुरविणे

**मु.शी.** : शालेय मध्यान्ह भोजनाच्या कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांना तांदूळ वेळेवर न पुरविणे यासंबंधी सर्वश्री. सुरेश जेथलिया, गोपीकिसन बाजोरिया, डॉ. निलम गो-हे, सर्वश्री. परशुराम उपरकर, किशनचंद तनवाणी, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

..................

**पृ.शी.** : अमरावती विभागातील शासकीय विदर्भ ज्ञान संस्था या महाविद्यालयाच्या परिसरातील रस्त्याची अत्यंत वाईट स्थिती असणे

**मु.शी.** : अमरावती विभागातील शासकीय विदर्भ ज्ञान संस्था या महाविद्यालयाच्या परिसरातील रस्त्याची अत्यंत वाईट स्थिती असणे यासंबंधी सर्वश्री. बी.टी. देशमुख, व्ही.यु. डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, वि.प.स.यानी दिलेली लक्षवेधी सूचना.

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

----------------

9....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : जळगाव जिल्हयात केळी पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतक-यांचे झालेले लाखो रुपयांचे नुकसान

**मु.शी.** : जळगाव जिल्हयात केळी पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतक-यांचे झालेले लाखो रुपयांचे नुकसान यासंबंधी श्री. अरुण गुजराथी, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

..........

**पृ.शी.**: आरोग्य विभागांतर्गत सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमात कार्यरत कंत्राटी कामगारांना शासकीय सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणे

**मु.शी.**: आरोग्य विभागांतर्गत सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमात कंत्राटी कामगारांना शासकीय सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणे यासंबंधी सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

.................

10......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-3-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) K-10

ABG/ प्रथम श्री. शिगम 13:20

**पृ.शी./मु.शी.**: विशेष उल्लेखाच्या सूचना

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

( सूचना मांडण्यात आली नाही )

-----------------

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

( सूचना मांडण्यात आली नाही )

-------------------

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

( सूचना मांडण्यात आली नाही )

------------------

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

( सूचना मांडण्यात आली नाही )

------------------

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

( सूचना मांडण्यात आली नाही )

--------------

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

( सूचना मांडण्यात आली नाही )

................... यानंतर श्री. कानडे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



**<u>सभापतीस्थानी तालिका सभापती (श्री. उल्हास पवार )</u>**

( विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देत असतात )

पृ.शी : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

मु.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

तालिका सभापती : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादा देशमुख यांनी मांडला असून त्याला सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी अनुमोदन दिले आहे. सदरहू प्रस्ताव प्रस्तुत झालेला आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेकरिता आज बुधवार,दिनांक 12 मार्च व गुरुवार,दिनांक 13 मार्च 2008 अशी एकूण दोन दिवस चर्चा होणार आहे. चर्चेसाठी एकूण सुमारे 6 तास उपलब्ध आहेत. मुख्यमंत्र्यांच्या उत्तराचा 1 तास सोडून उर्वरित 5 तासांचा वेळ सदस्यांना भाषणाकरिता देण्यात येईल. प्रस्तावकांना 10 मिनिटे देण्यात येतील व प्रस्तावाला पाठिंबा देणारे अनुमोदक 10 मिनिटे भाषण करतील. तसेच विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणासाठी 30 मिनिटे देण्यात येतील. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नांवे आपल्या पक्षाच्या प्रतोदांमार्फत माझ्याकडे पाठवावीत. नांवे प्राप्त झाल्यानंतर वेळेचे बंधन घालावे काय, याचा विचार करता येईल.

आता सन्माननीय सदस्य श्री. सुरेशदादा देशमुख हे आपला प्रस्ताव मांडतील तद्नंतर प्रस्तावाला अनुमोदन देणाऱ्या सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे भाषण करतील.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. सुरेशदादा देशमुख ( परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

" राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानपरिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

सभापती महोदय, केंद्र शासनाने सन 2008-2009 च्या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांसाठी 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा ऐतिहासिक आणि क्रांतिकारी निर्णय घेतला त्याबद्दल तमाम शेतकऱ्यांच्या वतीने मी माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग व सर्व केंद्रीय मंत्री तसेच सर्व खासदार यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठी केंद्र शासनाकडे आघाडी सरकारने सातत्याने पाठपुरावा केला त्याचे हे यश आहे असे मी समजतो. या सदनाचे नेते याठिकाणी उपस्थित आहेत. तसेच राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. विलासरावजी देशमुख यांच्या पुढाकाराने ही कर्जमाफी मिळाली त्याबद्दल सर्व शेतकऱ्यांच्या वतीने मी आभार मानतो.

( विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देत असतात )

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर मी भाषण करीत आहे. शेतकऱ्यांच्या बाबतीत बोलत असताना अशा पध्दतीने विरोधी पक्षाच्या सदस्यांनी वेलमध्ये बसून घोषणा देणे उचित आहे असे मला वाटत नाही. विदर्भातील सहा जिल्हयातील शेतीसमस्या कमी करण्यासाठी माननीय पंतप्रधान तसेच महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजमधील विविध योजनांची प्रभावीपणाने अंमलबजावणी करण्यात येत आहे. पंतप्रधान पॅकेजमधून तीन वर्षात एकूण 3750 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. त्यापैकी 2338 कोटी रुपये खर्च झालेले आहेत म्हणजे खर्चाचे प्रमाण 62.4 टक्के आहे. आजपर्यंत 2338 कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. शासनाच्या 1075 कोटी रुपयांच्या पॅकेजमधून 1109.83 लाख म्हणजे 103 कोटी रुपये अधिक खर्च करण्यात आले आहेत. त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना भूविकास बँकेच्या कर्जासाठी एकरकमी कर्जपरतफेड योजना शासनाकडून राबविण्यात येत आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.सुरेशदादा देशमुख...........

सदर योजनेनुसार शेतकऱ्यांनी भू-विकास बँकेकडून घेतलेल्या आणि 31 मार्च, 2004 रोजी त्यांच्याकडून येणे असलेल्या एकूण कर्जावरील व्याज शासनातर्फे भरण्यात येणार आहे. सन 2007-08 या वर्षात देखील 6 टक्के या सवलतीच्या व्याज दराने पीककर्ज देण्याचा निर्णय शासनाने

घेतला असून त्यासाठी 130 कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल मी माननीय राज्यपाल महोदयांचा मन:पूर्वक आभारी आहे.

सभापती महोदय, डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत विहित मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 25,000 रुपये पर्यंतच्या अल्प मुदतीच्या कर्जावर 4 टक्के इतकी व रुपये 25,000 पेक्षा जास्त परंतु रुपये 3 लाखापर्यंतच्या कर्जावर 2 टक्के इतकी व्याजाची सवलत लागू करण्यात आल्याचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात केलेला आहे.

सभापती महोदय, जलसंचय करणारी बांधकामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली आहेत. नियोजित 9000 चेक डॅम्सपैकी गेल्या 3 वर्षामध्ये 2842 डॅम्स बांधण्यात आले आहेत. 3000 शेततळी बांधण्यात आली आहेत. याशिवाय, 20 मध्यम पाटबंधारे आणि 233 लहान पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करुन 45,860 हेक्टर सिंचनक्षमता निर्माण करण्यात आल्याचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात केलेला आहे.

सभापती महोदय, सेंद्रिय शेती पध्दतीचा अवलंब करणे अत्यंत महत्वाचे असून त्यामुळे शेतीवरील लागवडीचा खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढत होईल. सन 2007-08 या वर्षात 862 शेतकरी गटांनी 1 लाख हेक्टर क्षेत्रात सेंद्रिय शेती करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे उत्पन्नात अधिक वाढ होऊन शेतकऱ्यांना फायदा होण्याच्या दृष्टीकोनातून देखील महत्वपूर्ण उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात केलेला आहे. माननीय पंतप्रधानांचे पॅकेज आणि राज्य पॅकेज या दोन्ही पॅकेजअंतर्गत विविध उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचे राज्यात अनुकूल परिणाम दिसू लागले आहेत. आघाडी सरकारने केलेल्या या कार्यामुळे अनुकूल परिणाम झाला. आघाडी सरकारने जे जे निर्णय घेतले ते अतिशय प्रशंसनीय असून त्याबद्दल माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात उल्लेख केलेला आहे.

..2..



श्री.सुरेशदादा देशमुख..........

सभापती महोदय, कृषि क्षेत्राचा विकास दर वाढविण्याबाबतच्या राष्ट्रीय धोरणास अनुसरुन 11 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये दरसाल 4 टक्के इतका विकास दर साध्य करण्याचे ठरविलेले आहे. या प्रयोजनार्थ शासनाने एक कार्यप्रणाली तयार केली असून त्यामध्ये जिल्हा कृषि विकास योजना तयार करणे, कृषि क्षेत्रामध्ये आणखी गुंतवणूक करणे, राष्ट्रीय कृषि विकास योजनेत सहभागी होणे, सिंचन सुविधा व जलसंधारणाची कामे वाढविणे, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान कार्यक्रमांतर्गत उच्च

किंमतीच्या नवीन पिकांच्या उत्पादनास चालना देणे आणि प्रमुख अन्नधान्य पिकांच्या व तेलबिया पिकांच्या उत्पादनात वाढ करणे यासारखे विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मधुमक्षिका पालन, रेशीम उत्पादन यासारख्या पीक इतर क्षेत्रात करावयाच्या सुधारणांचाही अंतर्भाव यामध्ये आहे. या विविध योजनांसाठी केंद्र सरकारने महाराष्ट्राला 142.20 कोटी रुपये रक्कम मंजूर केली आहे.

सभापती महोदय, राज्यातील साखर कारखाने आर्थिकदृष्टया अधिक सक्षम व्हावेत आणि विजेच्या उपलब्धतेमध्ये वाढ व्हावी म्हणून शासनाने साखर विकास निधीतून समभाग कर्ज उभारुन वाणिज्यिक संस्थांकडून कर्ज घेऊन आणि काही प्रमाणात शासनाकडून समभाग अंशदान देऊन साखर कारखान्यांमध्ये सह-वीजनिर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्यास चालना देण्याचे ठरविले असून त्या प्रकल्पापासून 1000 मे.वॅट वीजनिर्मिती होऊन राज्याला फायदा होऊ शकतो, याचा माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, आधुनिक पणन सुविधा पुरविण्यासाठी मुंबई, नाशिक आणि नागपूर येथे खाजगीकरणांतर्गत टर्मिनल बाजार उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. यासाठी अनुक्रमे 200 कोटी, 60 कोटी आणि 55 कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असून त्याचाही उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात केलेला आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नाचा चांगला मोबदला मिळण्यासाठी आंबा, मोसंबी, द्राक्षे, डाळिंबे, केळी, संत्री व भाजीपाला इत्यादींसाठी निर्यात सुविधा केंद्रे सुरु करण्यात येत आहेत.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेशदादा देशमुख .......

ही सुविधा केंद्रे ॲपेडाच्या सहकार्याने सिंधुदुर्ग, रत्नागिरी, जालना, पुणे, जळगांव, हिंगोली, वर्धा व लातूर या जिल्ह्यांमध्ये उभारण्यात येत असून त्यासाठी अंदाजे 50 कोटी रुपये खर्च येणार आहे. या केंद्रांमध्ये प्री-कुलींग, कोल्डस्टोरेज, रायपनिंग चेंबर्स, ग्रेडिंग लाईन, पॅक हाऊस इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत. दिनांक 1 एप्रिल, 2008 पासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची व्याप्ती वाढविण्यात येणार असून ती सर्व जिल्ह्यांमध्ये कार्यान्वित करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत, किमान 50 टक्के कामे ग्रामपंचायतीमार्फत पार पाडण्यात येणार आहेत. ही कामे हाती घेऊन पार पाडण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी, ग्रामपंचायत स्तरावरील 3 लाख अधिकाऱ्यांसाठी आणि पदाधिकाऱ्यांसाठी एक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

विदर्भ आणि मराठवाडयातील कापूस उत्पादक जिल्ह्यांतील जलसिंचन सुविधेमध्ये वाढ करण्यासाठी माझ्या शासनाने 17500 शेततळ्यांचे बांधकाम हाती घेतलेले आहे आणि त्यासाठी अंदाजे 80 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या शेततळयांची बांधकामे लाभार्थी व्यक्तींनी स्वत:च करावयाची असून नंतर शासन विहित दराने अशा खर्चाची प्रतिपूर्ती करणार आहे. या शेततळयांपैकी, पूर्णा खोऱ्यातील अकोला, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी 1500 शेततळी बांधण्यात येतील आणि इतर 13 जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी 1000 शेततळी बांधण्यात येतील.

शासनाने गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया व भंडारा या जिल्ह्यातील जुन्या मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीच्या बांधकामात देखील मंजुरी दिलेली आहे आणि त्याचा अंदाजित खर्च 20 कोटी रुपये आहे. ही दुरुस्ती बांधकामे पूर्ण झाल्यानंतर 3875 हेक्टर जलसिंचन क्षमता पुन:स्थापित होईल.

निर्मित सिंचनक्षमता आणि तिचा प्रत्यख वापर यातील अंतर कमी करण्याच्या प्रक्रियेत मागील वर्षी सुधारणा होऊन, सन 2005-06 मधील 55 टक्क्यांच्या तुलनेत सन 2006-07 मध्ये सदर टक्केवारी 65 टक्के झाली आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेशदादा देशमुख .............

खारपाण पट्टयातील पाण्याच्या उपलब्धतेची समस्या सोडविण्यासाठी माझ्या शासनाने, लघुपाटबंधारे प्रकल्पांचे पाणी साठ्यांचे मापदंड राज्याच्या इतर भागासाठीच्या प्रचलित मापदंडाच्या तिप्पट करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यामुळे अमरावती, बुलढाणा व अकोला या जिल्ह्यांमधील सुमारे 10000 हेक्टर क्षेत्रासाठी अतिरिक्त सिंचन सुविधा उपलब्ध होईल.

गेल्या तीन वर्षात रु. 11000 कोटी खर्च करुन 4.10 लक्ष हेक्टर सिंचनक्षमता निर्माण करण्यात आली आहे. सिंचन क्षेत्रातील आर्थिक अनुशेष रु. 5501 कोटीवरुन रु. 3217 कोटीपर्यंत कमी झाला आहे. सन 2007-08 मधील होणारा खर्च विचारात घेता हा अनुशेष सुमारे 1000 कोटी रुपयांची आणखी कमी होणार आहे. गोसी खुर्द प्रकल्प ही विदर्भातील 2.50 लाख हेक्टर सिंचनक्षमता असणारी मोठी सिंचन योजनाअसून या प्रकल्पाला भारत सरकारने राष्ट्रीय प्रकल्प म्हणून मान्यता दिली आहे.

भारत निर्माण कार्यक्रमाच्या व्याप्तीत वाढ करण्यात आली असून त्या कार्यक्रमांतर्गत, रासायनिक घटकांमुळे दूषित झालेल्या जलस्त्रोतांच्या पाण्याच्या दर्जाची समस्या असलेल्या सुमारे 9700 गावांचा समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण शाळांना आणि अंगणवाडयांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याची योजना यावर्षी पूर्ण करण्यात येईल.

मला हे सांगण्यास आनंद होत आहे की, संपूर्ण स्वच्छता मोहिमेअंतर्गत निर्मल ग्राम पुरस्कार मिळणाऱ्यांमध्ये माझे राज्य आजही अग्रेसर आहे आणि या वर्षीही राज्याने निर्मल ग्राम आणि निर्मल तालुका पुरस्कारांसाठी 6011 ग्रामपंचायतींचे आणि 30 पंचायत समित्यांचे प्रस्ताव पाठविले आहेत. तसेच पहिला संपूर्ण निर्मल जिल्हा, हा बहुमान कोल्हापूर जिल्ह्याने मिळविलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेशदादा देशमुख .....

सभापती महोदय, नैसर्गिक महासंकटामुळे बाधित राज्यांना मदत करण्यात महाराष्ट्र नेहमी आघाडीवर राहिले आहे. राष्ट्रीय एकात्मता पर्व सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून डिसेंबर, 2004 मध्ये आलेल्या त्सुनामीने बाधित झालेल्या व्यक्तिंचे पुनर्वसन करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने पाँडेचरी येथील 9 गावांमध्ये 1668 घरे बांधण्याचे ठरविले होते त्यापैकी 3 गावांमध्ये 500 घरांचा ताबा देण्यात आला आहे आणि उर्वरित घरांचे बांधकाम लवकरच पूर्ण करण्याचा आघाडी सरकारचा मनोदय आहे. तसेच केरळ राज्यातील त्सुनामीने बाधित झालेल्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्याची अशाच प्रकारची योजनाही आघाडी सरकारने केल्या बाबतचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात केल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, राज्यात प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या पाचव्या टप्प्याची अंमलबजावणी चालू आहे. या टप्प्यामध्ये 6079 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे बांधकाम करण्यात येणार असून त्यासाठी अंदाजे 1108 कोटी रुपये खर्च येणार आहे. या रस्त्यांमुळे 2471 वस्त्या जोडल्या जाणार आहेत या बाबीचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात केल्यामुळे मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या सहाव्या टप्प्यातील 4630 किलोमीटर लांबीच्या 441 रस्त्यांच्या बांधकाम कार्यक्रमास देखील मान्यता देण्यात आली असून त्यासाठी अंदाजे रुपये 1475 कोटी एवढा खर्च येणार आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी सन 2008-2009 या वर्षात करण्यात येणार आहे या बाबीचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात नमूद केल्यामुळे मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, नागपूर येथे मिहान प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले असून भारत सरकारने या प्रकल्पाकरिता स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त उपक्रम कंपनीकडे नागपूर विमानतळ सुपूर्द करण्याचे ठरविण्यात आले आहे ही बाब माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात नमूद केल्यामुळे मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

श्री. सुरेशदादा देशमुख .....

सभापती महोदय, मुंबई महानगर प्रदेशातील विमानसेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी नवी मुंबई येथे एक नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे तसेच मुंबई शहराला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याच्या योजनेचा एक भाग असलेले गेटवे ऑफ इंडियाच्या परिसराच्या सुशोभीरणाचे कामही प्रगतिपथावर आहे. वांद्रे-वरळी सागरी मार्ग या वर्षाअखेर वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल. मुंबई येथील छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे आधुनिकीकरण करण्याचे काम चालू असून त्याची चांगली प्रगती झालेली आहे या बाबीचा देखील उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात केल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आतापर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकास कामांकडेच लक्ष केंद्रित केलेले होते. आता मात्र प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशामध्ये असे पायाभूत सुविधा विकास प्रकल्प हाती घेण्याचे ठरविलेले असून यामध्ये ठाणे, मीरा-भाईंदर, मुंबई, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, भिवंडी-निजामपूर, उल्हासनगर या महानगरपालिका आणि 13 नगरपरिषदा यांचा समावेश आहे. याशिवाय, या प्रदेशातील ब-याचशा गावांना देखील याचा लाभ होईल. या प्रदेशातील प्रकल्पांचा एकूण खर्च अंदाजे 2 लाख कोटी रुपये इतका आहे आणि या विकास कामांकरिता आंतरराष्ट्रीय वित्तीय सहाय्य उपलब्ध व्हावे यासाठी आघाडी शासन प्रयत्नशील आहे बाबीचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात केल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, भारत सरकारने, नागरी क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास करण्याकरिता डिसेंबर, 2005 मध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान सुरु केले आहे. आतापर्यंत भारत सरकारने राज्यातील सुमारे 7000 कोटी रुपये खर्चाच्या 49 प्रकल्पांना मंजुरी दिली असून त्यासाठी महाराष्ट्राला अनुदानाचा पहिला हप्ता म्हणून 750 कोटी रुपये रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे. सर्व राज्यांसाठी देण्यात आलेल्या एकूण अनुदानाच्या सुमारे एक तृतीयांश रक्कम महाराष्ट्राला मिळालेली आहे. मंजूर प्रकल्प व मिळणारे अनुदान यामध्ये महाराष्ट्र सर्व राज्यांमध्ये अग्रेसर आहे या बाबीचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणा केल्यामुळे मी त्यांचे मनापासून आभार मानतो.

.....3



SGJ/ KGS/ MMP/ प्रथम श्री. भोगले... 13:40

श्री. सुरेशदादा देशमुख .....

सभापती महोदय, महाराष्ट्राने लहान व मध्यम शहरांसाठी असलेल्या नागरी पायाभूत सुविधा विकास योजनेअंतर्गत 61 शहरांचे 81 विकास प्रकल्प अहवाल पाठविले आहेत. यापैकी 25 प्रकल्पांसाठी भारत सरकारने 190 कोटी रुपये वितरीत केलेले आहे या बाबीचाही माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात उल्लेख केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 13.45

श्री.सुरेशदादा देशमुख ......

सभापती महोदय, बृहन्मुंबई पर्जन्यजलवाहिनी यंत्रणा प्रकल्पाकरिता केन्द्र सरकारने 1200 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. त्यापैकी या वर्षात 400 कोटी रुपये वितरित करण्यात आलेले आहेत. असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे. अशाच प्रकारचा निधी मराठवाडयासाठी दिला असता तर त्याचे आम्ही चांगले स्वागत केले असते. माननीय राज्यपालांनी ज्या काही चांगल्या बाबींचा उल्लेख केलेला आहे त्याचे आपण स्वागत करीत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारने नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर केलेले असून त्यामध्ये विशेष नगर वसाहतीचे बांधकाम, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास, नागरी पुनर्निर्माणासाठी सामूहिक विकास योजना, पुनर्विकास प्रकल्पांसाठी संयुक्त योजना, जुन्या म्हाडा वसाहतींचा व गावठाणांचा पुनर्विकास यासाठी तरतूद आहे. या धोरणामध्ये आर्थिक दृष्टया दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट यांच्यासाठी लहान घरे बांधण्याकरिता प्रत्येक आराखडयामध्ये काही जागा राखून ठेवणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. राज्यातील सर्वसामान्य माणसाना न्याय मिळावा यासाठी आघाडी सरकारने अशी व्यवस्था केली असून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात हा उल्लेख करण्यात आला आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो.

सभापती महोदय, आपले राज्य उद्योगाच्या बाबतीत पहिल्या नंबर वर आहे. 2007 मध्ये राज्यात सुमारे 62, 600 कोटी रुपयांची गुंतवणूक असणारे आणि 2 लाख 10 हजार व्यक्तींना रोजगार मिळू शकेल इतक्या क्षमतेचे 454 प्रकल्प कार्यान्वित करण्याचे प्रस्ताव अंतर्भूत असलेली औद्योगिक आवेदन पत्रे व इरादापत्रे सादर करण्यात आलेली आहेत आणि 19 जैव तंत्रज्ञान युनिटांची नोंदणी करण्यात आली आहे. असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो.

सभापती महोदय, राज्य शासनाने एक खिडकी योजनेव्दारे जलदगतीने मंजुरी व कार्यपध्दतीचे सुलभीकरण या माध्यमातून गुंतवणूक आकर्षित करण्याकरिता जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. असा उलेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेशदादा देशमुख ......

सभापती महोदय, बांधा वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर काही महत्वाच्या राज्य महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचे काम वेगाने सुरु असून या वर्षात 1800 कोटी रुपये खर्चाच्या 14 नवीन प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देतात )

सभापती महोदय, शासनाने भाविकांच्या सोयीसाठी ठाणे जिल्हयातील हाजीमलंग येथे व नाशिक जिल्हयातील सप्तश्रृंगी येथे फयुनिक्युलर ट्रॉली यंत्रणा बसविण्याच्या प्रकल्पास देखील मंजुरी दिली आहे. असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो.

सभापती महोदय, स्वातंत्र्य सैनिकांना निवासी प्रयोजनासाठी जमीन देण्याबाबतच्या योजनेत सुधारणा करण्यात आली आहे. महानगरपालिका क्षेत्र वगळता, नागरी क्षेत्रामध्ये जमिनीच्या उपलब्धतेनुसार 2500 चौरस फुटापर्यंत शासकीय जमीन देण्यात येणार असल्याचा निर्णय आघाडी सरकारने घेतला असून त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो.

सभापती महोदय, राज्य शासनाने विकलांग व्यक्तिंना, मनोरंजन केन्द्र, संशोधन केन्द्र यासह विविध प्रयोजनांकरिता सवलतीच्या दराने शासकीय जमिनीचे नियतवाटप करण्याचे ठरविले आहे. असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो.

सभापती महोदय, कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी व मजबूत करण्यासाठी राज्य शासनाने पोलीस विभागामध्ये 55000 पदांची निर्मिती करण्याचा निर्णय या पूर्वीच घेतला होता. मागील दोन वर्षात त्या पदापैकी 22042 पदे भरण्यात आली आहेत. 2008-2009 या वर्षात आणखी 11021 पदांची निर्मिती करुन ती भरण्यात येतील असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो.

3..



VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 13.45

श्री.सुरेशदादा देशमुख ......

सभापती महोदय, आत्मसमर्पण योजने व्दारे बहुसंख्य नक्षलवाद्यांना त्यांच्या मार्गापासून परावृत्त करुन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात आघाडी सरकारने यश मिळविले आहे. या योजनेअंतर्गत 231 नक्षलवादी शरण आले असून आता या योजनेची मुदत ऑगस्ट 2008 पर्यत वाढविण्यात आली आहे. असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषण्ांत करण्यात आला आहे त्याबद्ल मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो.

सभापती महोदय, दिवाणी व फौजदारी दावे स्थानिक पातळीवर सलोख्याने मिटवण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने जनतेचा सहभाग असणारी एक पर्यायी तंटा निवारण यंत्रणा सुरु केली आहे. "महात्मा गांधी तंटा मुक्त गाव मोहीम" या नावाने ही योजना सुरु केली असून या योजनेला संपूर्ण राज्यातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश देशमुख ....

सभापती महोदय, विजेची उपलब्धता आणि त्या तुलनेत असलेली विजेची मागणी यांनी उभे केलेले आव्हान अद्यापही कायम आहे. पारस, परळी, खापरखेडा व भुसावळ येथे नवीन वीज निर्मिती प्रकल्पांचे काम सुरू करण्यात आले असून त्याद्वारे एकूण 2000 मे.वॅ. अतिरिक्त वीज उपलब्ध होणार आहे. या व्यतिरिक्त, पारस येथे 250 मे.वॅ. क्षमतेचे एक वीज निर्मिती युनिट सुरू करण्यात आलेले आहे. त्याचाही उल्लेख माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये केला आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सभापती महोदय, 'सिंगल फेज योजना' आणि 'गावठाण फिडर सेपरेशन योजना' यांचा पहिला टप्पा कार्यान्वित झाला असून त्यामुळे सुमारे 15,597 गावांना विजेच्या बाबतीत दिलासा मिळालेला आहे. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे काम हाती घेण्यात आले असून त्यामुळे आणखी 12600 गावांना विजेच्या बाबतीत दिलासा मिळणार आहे. राज्यातील जनतेला वीज टंचाईमुळे सोसाव्या लागणाऱ्या अडचणींची माझ्या शासनाला पूर्ण जाणीव असून शासन ही आव्हाने पेलण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. विजेचा काटकसरीने वापर करून आपण सर्वांनीच हे आव्हान पेलण्यासाठी शासनाला सहकार्य करावे असे मी या निमित्ताने आपणा सर्वांनाच आवाहन करतो.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये घोषणा देत असतात.... अडथळा...)

सभापती महोदय, राज्यातील आरोग्य सेवांमध्ये आणखी सुधारणा घडवून आणण्यासाठी शासनाने नंदूरबार, वाशिम व हिंगोली येथील जिल्हा रूग्णालयांतील खाटांची संख्या दुप्पट करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. तसेच नाशिक व अमरावती येथे दोन सुपर स्पेशालिटी रूग्णालये सुरू करण्याचेही शासनाने ठरविले आहे. तसेच राज्यातील 22 जिल्हा रूग्णालयांत भारतीय अवकाश संशोधन संघटनेच्या मदतीने टेलिमेडिसीन सुविधा उपलब्ध करून देण्याचेही सरकारने प्रस्तावित केलेले आहे. ही संघटना उपग्रहाशी संपर्क साधून देईल आणि अशी टेलिमेडिसीन सुविधा देण्यासाठी आवश्यक असलेले संगणक सॉफ्टवेअर पुरविणार आहे. या गोष्टीचाही माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणात उल्लेख केला आहे, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. सभापती महोदय, या वर्षामध्ये एड्सग्रस्त रूग्णांसाठी नवीन 15 अँटी रेट्रोव्हायरल म्हणजेच एआरटी उपचार केंद्रे हे आघाडी शासन सुरू करणार आहे. तसेच कर्करोगाचे निदान आणि उपचार यासाठी सुविधा पुरविण्याकरिता औरंगाबाद येथे एक नवीन रूग्णालय बांधण्याचेही

...... क्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देशमुख ....

सरकारने ठरविले आहे. त्याच बरोबर पुणे येथील बी.जे.मेडिकल कॉलेजमधील आणि ससून सर्वोपचार रूग्णालयातील सुविधांचा दर्जा वाढविण्याचे देखील आघाडी सरकारने ठरविले असून त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणात केला आहे, त्याबद्दल मी त्यांचे या निमित्ताने आभार मानतो.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये घोषणा देत असतात.... अडथळा...)

सभापती महोदय, अनुसूचित जाती आणि नवबौद्धांचे जीवनमान उंचाविण्यासाठी शासन अनेक नवीन योजना सुरू करीत आहे. त्यात होतकरू वैमानिक, हवाईसुंदरी आणि विमानातील कर्मचारी वर्ग यांना आर्थिक प्रोत्साहन देण्याच्या योजनेचा समावेश आहे. तसेच अनुसूचित जातीच्या व नवबौद्ध अभियांत्रिकी पदवीधर मुलांना खाजगी संस्था आणि उद्योगांच्या सहयोगाने नोकरीच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न हे आघाडी सरकार करणार आहे आणि याचा उल्लेख माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणात केला आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. सभापती महोदय, ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम आदिवासी उपयोजना क्षेत्रातील, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व आदिवासी उपयोजना क्षेत्राबबाहेरील गावांमध्ये आघाडी शासनाकडून राबविण्यात येत आहे. 2007-08 मध्ये या योजनेंतर्गत 50 टक्के व त्याहून अधिक आदिवासी लोकसंख्या असलेल्या वस्त्यांचा समावेश करण्यात आला असून त्यासाठीची तरतूद 60 कोटी रूपयांपर्यंत सरकारने वाढविली आहे. या योजनेतून या वस्त्यांमध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता, रस्ते, वीज यासारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर अनुसूचित जमातीच्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिक्षणाची सुविधा मिळावी म्हणून सध्या त्यांच्या साठी असलेल्या 343 वसतिगृहांच्या संख्येत वाढ या शासनाने केली आहे शिवाय त्यांच्यासाठी आणखी 140 वसतिगृहे बांधण्यात येणार आहेत व त्यासाठी 454 कोटी रूपये खर्च येणार आहे. यामुळे आदिवासी मुलींसाठी व मुलांसाठी वसतिगृहांमध्ये 32625 अतिरिक्त जागा उपलब्ध होणार आहेत. त्याचबरोबर या अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी, परीक्षा फी व अन्य फीची प्रतिपूर्ती करण्याबाबतच्या योजनेची व्याप्ती वाढवून ती शासनाच्या मान्यताप्राप्त, विनाअनुदानित व कायम स्वरूपी विनाअनुदानित संस्थांतील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू करण्यात आलेली आहे. तसेच राज्याच्या निधीतून टप्प्याटप्प्याने अंगणवाडी केंद्रासाठी इमारती बांधण्यात येणार आहेत

...... क्यू 3 ...



KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 13:50

आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात दरमहा 400 रूपयांची वाढ करण्याचा निर्णय या आघाडी सरकारने घेतलेला आहे व त्याचाही उल्लेख माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणात केली असल्याने मी त्यांचे त्याबद्दल आभार मानतो.

सभापती महोदय, मुंबई महानगर प्रदेशात नागरिकांना प्रवास करणे सोयीचे व्हावे म्हणून आघाडी सरकारने स्वतंत्र प्रादेशिक परिवहन प्राधिकरण स्थापन करण्याचे ठरविले आहे त्यामुळे प्रवाशांना संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात ऑटो रिक्शा व टॅक्सीतून प्रवास करणे सुलभ होणार आहे. तसेच संगणकीकृत स्मार्ट कार्ड वाहनचालन परवाना देण्याची पद्धत अधिक व्यापक केली आहे. तसेच राज्याच्या ग्रामीण भागातील रेल्वे वाहतूक वाढविण्याच्या दृष्टीने रेल्वे मंत्रालयाने वर्धा-यवतमाळ-पुसद-नांदेड आणि मनमाड-मालेगाव-धुळे-शिरपूर-इंदौर हे दोन नवीन रेल्वे मार्ग महाराष्ट्रात घेण्याचे जाहीर केले आहे, या प्रकल्पांसाठी आघाडी सरकारने आर्थिक सहाय्य देणार आहे याही गोष्टीचा उल्लेख माननीय राज्यपालांनी त्यांच्या भाषणात केला आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, आमचे विरोधी मित्र माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील माझे भाषण ऐकत नाहीत, घोषणा देऊन ते माझ्या भाषणामध्ये अडथळा आणीत आहेत त्यामुळे मला अशा प्रकारे बोलावे लागते आहे. तमाम शेतकऱ्यांचे कैवारी असलेल्या या आघाडी सरकारच्या योजनांचा आपल्या भाषणात आवर्जून उल्लेख केल्याबद्दल माननीय राज्यपालांचे आभार मी मानत असताना त्यात अशा प्रकारे आमच्या मित्रांनी खोडा घालणे हे उचित वाटत नाही आणि त्यांनी कितीही माझ्या भाषणामध्ये व्यत्यय आणला तरी मी माझे भाषण पूर्ण केल्याशिवाय बसणार नाही हेही मी सांगू इच्छितो.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये घोषणा देत असतात.... अडथळा...)

( यानंतर श्री. सरफरे .... आर 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश देशमुख....

(विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ उभे राहून घोषणा देतात.)

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना सांगू इच्छितो की, अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना विकासाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र पुरस्कृत योजना राबविण्याचा निर्णय आघाडी सरकारने घेतला आहे. त्याचा देखील माननीय राज्यपाल महोदयांनी उल्लेख केलेला आहे, त्याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे. त्याचप्रमाणे तमाशा, लावणी, दशावतार व खडीगंमत इत्यादी लोककलांचे संवर्धन करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नवीन धोरण देखील आघाडी सरकारने जाहीर केले आहे. त्याचा देखील उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणामध्ये केला आहे. त्याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

मुंबई शहरातील पर्यटन विकास आणि ऐतिहासिक वास्तूंच्या जतन व संवर्धनाकरिता विशेष कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये गेट वे ऑफ इंडिया, बाणगंगा या परिसरांचा आणि मुंबईतील वरळी, वांद्रे, घोडबंदर, शिवडी व वसई येथील किल्ल्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे शिधापत्रिकांचे आणि उद्दिष्टित सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्याचा प्रकल्प लवकरच सुरु करण्यात येणार आहे. न्यायदानाची प्रक्रिया गतिशील व्हावी म्हणून उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची संख्या 64 वरुन 75 इतकी वाढविण्याच्या प्रस्ताव देखील शासनाने तयार केला आहे. त्याचा देखील माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणामध्ये केला आहे. न्यायालयांमध्ये मराठी भाषेच्या वापराला उत्तेजन दिले आहे. आणि त्यानुसार दुय्यम न्यायालयांमधील न्यायाधीशांनी मराठीमध्ये निर्णय देण्यास सुरुवात केली असून, सामान्य माणसांची दीर्घकाळ प्रलंबित असलेली मागणी पूर्ण झालेली दिसून येत आहे. त्याबाबत माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणामध्ये उल्लेख केला आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपाल महोदयांचा आभारी आहे.

सभापती महोदय, प्रत्येक जिल्हयाच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी विधि सेवा प्राधिकरणाचे कार्यालय स्थापन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे केंद्र सरकारने नुकत्याच प्रस्तावित केलेल्या

DGS

श्री. सुरेश देशमुख....

"ग्राम न्यायालय" विधेयकाला शासनाने सहमती दर्शविल्याचा उल्लेख या अभिभाषणामध्ये करण्यात आला आहे. अल्पसंख्याकांच्या विकासाकरिता एक स्वतंत्र विभाग नुकताच स्थापन करण्यात आला आहे. त्यांच्या विकाससंबंधातील सर्व विषय अल्पसंख्यांक विकास विभागाच्या नियंत्रणाखाली

आणण्यात आले आहेत. महाराष्ट्राला डिजिटल महाराष्ट्र बनविण्याच्या दृष्टीने माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणामध्ये उल्लेख केलेला आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपाल

महोदयांचा आभारी आहे. सभापती महोदय, या शासनाने दीर्घकाळ प्रलंबित असलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 131 (ख) अन्वये सर्वोच्च न्यायालयात एक विशेष दिवाणी दावा दाखल केला आहे. राज्याची बाजू खंबीरपणे व स्पष्टपणे मांडण्यासाठी नामांकित वकिलांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंबंधी माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणामध्ये उल्लेख केला आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपाल महोदयांचा आभारी आहे. सभापती महोदय, या सभागृहामधील सर्व माननीय सदस्यांच्या वतीने मी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो आणि आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव याठिकाणी मांडून माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ उभे राहून घोषणा देतात.)

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. सुरेश देशमुख यांनी सन्माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आहे. आणि त्यावर त्यांनी अत्यंत चांगले, दर्जेदार आणि विश्लेषणात्मक भाषण केले आहे. सभापती महोदय, या राज्याचे सरकार या राज्यातील शेतकरी, या राज्यातील शेतमजूर, या राज्यातील कामगार, या राज्यातील अनुसूचित जाती जमाती, या राज्यातील महिला वर्ग, या राज्यातील आदिवासी या सर्वांच्या हिताची जोपासना करण्याच्या दृष्टीने हे शासन निर्णय घेत असल्याचे या सभागृहाच्या पटलावर दिसून येत आहे. आणि म्हणून माननीय राज्यपालांचे अभिभाषण झालेले आहे. माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणामध्ये शासनाने घेतलेल्या निर्णयांचा उल्लेख केला आहे. त्या सर्व निर्णयासंबंधी मी या राज्य शासनाचे अभिनंदन करते आणि या अभिभाषणाला पाठिंबा देते. या अभिभाषणाच्या सुरुवातीला केंद्र सरकारच्या 2008-09 च्या अंदाजपत्रकामध्ये शेतकऱ्यांच्या 60 हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा निर्णय घेतलेला आहे. या निर्णयामुळे देशातील 81 टक्के शेतकऱ्यांचा 7/12 कोरा होणार आहे. हा 7/12 कोरा होत असतांना ज्या ज्या शेतकऱ्यांनी कर्जे घेतलेली आहेत, त्यामध्ये कोकण किनाऱ्यावर मत्स्य व्यवसाय करणारा कोळी समाजातील शेतकरी असेल, मत्स्यशेती करणारा शेतकरी असेल,फळबाग योजनेमध्ये लागवड करुन या देशातील फलोत्पादन क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करणारा शेतकरी असेल या सर्व अल्पभूधारक शेतकऱ्यांची कर्जे माफ होणार आहेत. महाराष्ट्रामध्ये नामदार श्री. शरदचंद्रजी पवार साहेब हे मुख्यमंत्री होते. त्यावेळी महाराष्ट्रामध्ये फलोत्पादन आणि फ्लोरिकल्चरचे उत्पादन वाढविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे . . . .

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देत असतात.)

याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रामध्ये अनेक शेतकऱ्यांनी फळबागांची लागवड करण्याचा प्रयत्न केला आहे. मग ती द्राक्ष, केळी, संत्र, मोसंबी, आवळा, चिंच, आंबा इ. पिके असतील किंवा हल्ली ज्याचा महाराष्ट्रामध्ये फार मोठया प्रमाणात गवगवा होतो, ज्याला बाजरीपेक्षाही कमी पाणी लागते असे सीताफळाचे पीक असेल. हे सीताफळाचे रोप निसर्गत: बीड जिल्हयाच्या धारुर, परभणी, बीड, शिरुर आणि परळी इ.तालुक्यांच्या डोंगर भागामध्ये आणि बालाघाटाच्या पर्वताच्या कुशीमध्ये वाढणारे आहे. या फळाचे बी निजामाने या देशातील राजस्थान मधून आणले आणि ते बीड जिल्हयामध्ये लावण्याचा प्रयत्न केला. तेथे सीताफळाच्या झाडाची लागवड फार मोठया प्रमाणात होत आहे. आपण जर माजी आमदार माननीय श्री.ना.धों.महानोर यांची शेती पाहिली तर असे दिसून येईल की, त्यांनी 100 एकर माळरानावर सीताफळाची झाडे वाढविलेली आहेत. त्याचा आदर्श घेऊन या महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांनी फळबाग लागवड करण्यास सुरुवात केली आहे. खरे म्हणजे सध्याच्या पारंपारिक शेतीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा कणा ऊंचावत नाही. अशा वेळी शेतकऱ्याने वेगळया पध्दतीने शेती करण्याची गरज आहे ही भूमिका घेऊन महाराष्ट्र वाटचाल करीत आला आहे आणि त्यामुळेच शेतकरी फळबाग लागवडीकडे वळला आहे. जो शेतकरी फळबाग लागवडीकडे वळला, त्याला शासनाने अनुदान देण्याचाही निर्णय घेतला. परंतु त्याचबरोबर काही योजना अशा आहेत की, शेतकऱ्यांना कर्ज घ्यावे लागते. परंतु शेतकरी काही अडचणींमुळे कर्जाची परतफेड करु शकला नाही. मग शेतकऱ्यानी नांगरासाठी घेतलेले कर्ज असेल, विहिरीसाठी घेतलेले कर्ज असेल, ट्रॅक्टरसाठी घेतलेले कर्ज असेल किंवा आणखी कोणत्याही प्रकारचे कर्ज असेल, परंतु या राज्यातील शेतकरी हे कर्ज फेडू शकलेला नाही. महाराष्ट्रामध्ये काही जिल्हयांमध्ये फक्त 30 दिवस पाऊस पडतो आणि काही ठिकाणी तर या 30 दिवसामध्ये काही तास पाऊस पडतो. आपण राज्यामध्ये पाणी अडवा आणि पाणी जिरवा यासारखी योजना फार मोठया प्रमाणात राबवित असलो तरी सुध्दा शेतकरी पावसाच्या लहरीपणावर बऱ्याच प्रमाणात विसंबून आहे. त्यामुळे शेतकरी त्याला शेतीमधून मिळणाऱ्या उत्पन्नावर स्वत:ची आर्थिक परिस्थिती सांभाळू शकत नाही. आपण कितीही प्रयत्न केला तरी विदर्भ आणि मराठवाडयातील.....

. . . .एस-2

श्रीमती उषाताई दराडे . . . .

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देत असतात.)

शेतकरी स्वत:च्या मुलांचे शिक्षण,स्वत:च्या कुटुंबातील व्यक्तींचे आरोग्य चांगल्या प्रकारे ठेऊ शकत नाही. शेतकरी आत्महत्येला प्रवृत्त होण्याचे एकमेव कारण म्हणजे केवळ कर्जबाजारीपणा नाही. त्याची अनेक कारणे आहेत. परंतु कर्जबाजारीपणा हे देखील याचे एक कारण आहे ही गोष्ट नाकारता येणार नाही. केंद्र शासनाने विदर्भातील शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करण्यासाठी एक पॅकेज दिले.परंतु हे पॅकेज देऊन सुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत, शेतकऱ्यांच्या पाठीचा कणा उभा राहत नाही. म्हणून या देशाचे कृषीमंत्री नामदार श्री.शरदचंद्रजी पवारसाहेब यांनी अकोला येथील सभेमध्ये असे वक्तव्य केले की, शेतकऱ्यांचा 7:12 चा उतारा कोरा करणे हाच त्या वरील पर्याय आहे. कृषीमंत्री नामदार श्री.शरदचंद्रजी पवारसाहेब यांनी अकोला येथील सभेमध्ये हे भाष्य केल्यानंतर या महाराष्ट्रामध्ये विरोधी पक्षांचे मोर्चे निघू लागले, मेळावे होऊ लागले, भाष्य व्हावयास लागली, निवेदने व्हावयास लागली आणि विरोधकांनी शेतकऱ्यांच्या हिताच्या गप्पा मारण्यास सुरुवात झाली. खरे म्हणजे या लोकशाहीमध्ये विरोधकांची भूमिका ही अत्यंत आवश्यक आहे.विरोधकांचे अस्तित्व फार आवश्यक आहे आणि त्याचा आपण सर्वांनी सन्मान केला पाहिजे. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी विरोधी पक्ष हा महत्वाचा घटक आहे. परंतु विकासाच्या मुद्यावर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांबरोबर सकारात्मक भूमिका घेणे ही देखील काळाची गरज आहे. विदर्भामध्ये दिलेल्या पॅकेजचा फायदा 100 टक्के झाला नसेल. पण काही प्रमाणात नक्कीच झाला आहे. पण तरी सुध्दा शेतकऱ्यांचा 7:12 चा उतारा कोरा करावा लागेल अशी आग्रही भूमिका या देशाच्या माननीय कृषी मंत्र्यांची होती. आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान नामदार श्री.मनमोहन सिंगजी, माननीय अर्थमंत्री श्री.चिदंबरम् या सर्वांची आणि केंद्र शासनाची भूमिका ही आमच्या माननीय कृषीमंत्र्यांच्या भूमिकेशी सुसंगत राहिली आणि माननीय कृषीमंत्री नामदार श्री.शरदचंद्रजी पवार यांनी सुचविलेला कर्जमाफीचा प्रस्ताव केंद्र शासनाने मान्य केला. दोघांमध्ये समन्वय झाला आणि त्यामुळे या देशातील 81 टक्के शेतकऱ्यांचा 7:12 चा उतारा कोरा झालेला आहे. मग तो कर्नाटक, आंध्र, महाराष्ट्र, केरळ, नागालँण्ड, त्रिपुरा, पश्चिम बंगाल, पंजाब, हरियाणा इ. राज्यातील देखील शेतकरी असेल. त्यामुळे आपण या राज्यामध्ये मागणी केली म्हणून या देशातील

. . . .एस-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे . . . .

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देत असतात.)

शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले अशा प्रकारची भूमिका घेणाऱ्यांनी आपले अंगण किती आहे ते पाहून स्वत:चे अंथरुण टाकले पाहिजे आणि भाष्य करावयास पाहिजे.तसेच त्यांनी खुल्या दिलाने केंद्र शासनाचे अभिनंदन केले पाहिजे आणि केंद्र शासनाला थोडा वेळ दिला पाहिजे. कारण केंद्र शासनासमोर 60 हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा जो प्रस्ताव आहे. त्यावर लोकसभेमध्ये आणि राज्यसभेमध्ये विस्तृतपणे चर्चा होणार आहे. यासंदर्भात माननीय अर्थमंत्री उत्तर देणार आहेत. यामध्ये कोणत्या घटकाला किती कर्जमाफी मिळेल, यामध्ये भूविकास बँकेमार्फत कोणता लाभ मिळेल.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देत असतात. )

श्रीमती उषाताई दराडे .....

वेगवेगळ्या सहकारी बँकांमार्फत काय लाभ मिळेल, सोसायट्यांमार्फत काय लाभ मिळेल, दुग्धव्यवसायामधील शेतकऱ्यांना काय लाभ मिळेल, मत्स्यव्यवसायामधील शेतकऱ्यांना काय लाभ मिळेल या सर्व गोष्टी स्पष्ट होऊन या सभागृहासमोर येतील. मला खात्री आहे की, या महाराष्ट्रातील शेतकरी निश्चितपणे कर्जमुक्त होईल आणि जो आत्महत्येच्या बाजूने जातो त्याला जगण्याची दिशा मिळेल, जगण्याची उमेद मिळेल, त्यांची पतमर्यादा वाढेल आणि या राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांना नवीन कर्ज मिळेल. पतमर्यादा वाढल्यामुळे, त्यांची ऐपत वाढल्यामुळे ते नवीन कर्ज घेतील आणि नव्या उमेदीने शेती व्यवसायामध्ये स्वत:चा विकास केल्याशिवाय राहणार नाही याचा मला आत्मविश्वास वाटतो. दुर्दैवाने आमच्या देशामध्ये विरोधी पक्षांना भावनेला हात घालून राजकारण करण्याची सवय लागलेली आहे. त्यामुळे राज्याच्या लोकशाहीचे नुकसान होत आहे. कधी बाबरी मशिदीचा प्रश्न उपस्थित करावयाचा, कधी हिंदुत्वाच्या भावना भडकवावयाच्या, कधी गुजरात पॅटर्न महाराष्ट्रामध्ये आणण्याच्या वल्गना करावयाच्या, कधी रामाच्या नावाने राजकारण करावयाचे असे चालले आहे. माझा असा प्रश्न आहे की, केंद्रामध्ये जेव्हा भाजप-शिवसेनेचे राज्य होते तेव्हा त्यांनी रामाचे मंदिर बांधले का ? बाबरी मशीद पाडण्याचे समर्थन केले परंतु रामाचे मंदिर बांधले नाही. म्हणजे या विरोधकांना फक्त प्रश्न निर्माण करावयाचे आहेत आणि त्याविषयी बोलावयाचे आहे. विरोधी पक्षाने सच्चर समितीच्या बाबतीत सुध्दा तसेच केले. मी या ठिकाणी शासनाचे अभिनंदन करीन. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अल्पसंख्यांकांसाठी महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याबाबत भाष्य केलेले आहे. खरे म्हणजे ही केवढी मोठी बाब आहे. देशामध्ये कदाचित महाराष्ट्र हे पहिले राज्य असेल. अल्पसंख्यांकासाठी सच्चर समितीने केलेल्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय केंद्र सरकार घेणार, राज्य सरकार घेणार आणि अंमलबजावणी करणार याचे सुतोवाच आमचे नेते करत राहतात, सत्ताधारी पक्षाचे नेते करत राहतात आणि विरोधी पक्षाचे लोक महाराष्ट्रामध्ये सभा सम्मेलने

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

श्रीमती उषाताई दराडे ......

करतात. गावागावामध्ये जातात आणि शिफारशी लागू करा असे सांगतात. जे आमदार नागपूरमध्ये बाहेर सभा घेऊन अल्पसंख्यांकांना सांगतात की आम्हीच तुमचे रक्षणकर्ते आहोत, त्यांचे नेते सांगतात की, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत आणि सभागृहामध्ये त्याचे प्रतिनिधी सच्चर समितीच्या शिफारशींच्या निषेधाच्या घोषणा देतात. हा लोकशाहीतील विरोधाभास आहे. म्हणून सच्चर समितीच्या बाबतीत विरोधकांची भूमिका म्हणजे पुतना मावशीचे प्रेम आहे. खऱ्या अर्थाने सत्ताधारी पक्षाने राज्यामध्ये वेगळा अल्पसंख्याक सेल निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. हा अल्पसंख्यांक सेल राज्यामध्ये निर्माण झाला. राज्यामध्ये अल्पसंख्यांकांचे काय प्रश्न आहेत ? अल्पसंख्यांकांच्या मुलांना योग्य शिक्षण दिले गेले पाहिजे. त्याची जी मूलभुत भाषा उर्दू आहे त्या भाषेत त्यांना शिक्षण घेण्याचा प्रयत्न करता आला पाहिजे. त्या शाळांचे सशक्तीकरण झाले पाहिजे. त्यांना व्यवस्थित पैसे उपलब्ध करुन दिले गेले पाहिजेत. त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण घेण्यासाठी त्यांना मदत करणे गरजेचे आहे. आज अल्पसंख्यांक समाजातील मुले गॅरेजमध्ये काम करतात, पापड विकण्याचे काम करतात. त्यांना शिक्षण देणे, त्यांना नोकऱ्यांमध्ये सामावून घेणे, त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने मदत करणे ही भूमिका आहे. एकीकडे राज्य सरकार यासाठी काम करीत आहे तर दुसरीकडे विरोधी पक्षाची माणसे केवळ अल्पसंख्यांकाचे नाव घेतात आणि आमदारांना नोटिसा पाठवत आहेत. आमदार श्री. पाशा पटेल यांची अत्यंत दयनीय अवस्था त्या ठिकाणी होते. त्यांना नोटीस दिली जाते. म्हणून या पध्दतीने दुटप्पी भूमिका घेणाऱ्या विरोधी पक्षाच्या भूमिकेचा मी या ठिकाणी निषेध करते. लोकशाहीला अत्यंत चुकीच्या पध्दतीचे वळण देणारी ही भूमिका आहे. म्हणून मी या घटनेचा तर विरोध करतेच पण आजही विरोधी पक्षाने सहकार्याची भूमिका घेऊन या सर्व निर्णयांचे स्वागत करावे आणि समजूतदारपणा दाखवावा, लोकशाहीला साजेशी भूमिका घ्यावी अशा प्रकारची अपेक्षा मी त्यांच्याकडून व्यक्त करते. एक मागणी सर्वच पक्षाकडून होते. फक्त विरोधी पक्षांकडूनच नव्हे तर सर्वच पक्षांकडून मागणी होते की, 5 एकराच्या वरच्या शेतकऱ्यांचे काय ? परंतु अजून केंद्राची पूर्ण भूमिका बाहेर यावयायची आहे. ती भूमिका बाहेर येण्यापूर्वी त्या भूमिकेविषयी संशय व्यक्त करणे योग्य नाही. परवा बीड येथे शेतकऱ्यांच्या अभिनंदनाच्या ठरावाच्या

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

श्रीमती उषाताई दराडे .....

सभेमध्ये बोलत असताना माननीय कृषीमंत्री बोलले की आष्टी तालुक्यातून जात असताना 15 एकर जमिनीचा मालक, 20 एकर जमिनीचा मालक त्यांच्या शेतीवर कुसळ वाढत आहे. याची दखल केंद्र सरकार घेणार आहे. हा सुतोवाच माननीय कृषी मंत्र्यांनी बीडच्या सभेत केलेला आहे. जेव्हा आपण सुतोवाच करतो तेव्हा त्या विषयावर विरोधकांनी बोलावे हा नेहमीचाच खाक्या असल्यामुळे त्यासंदर्भात फार दखल घेण्याची आवश्यकता नाही.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देत असतात. )

श्रीमती उषाताई दराडे.....

केंद्र सरकार निश्चितच 5 एकरावरील शेतक-यांना सुध्दा कर्जमाफीचा लाभ देण्याच्या दृष्टीने काही तरी प्रयत्न करील आणि राज्यही आपला वाटा उचलेल याची मला खात्री वाटते. यासंबंधी राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये एकरकमी कर्ज परतफेड योजना आहे, या योजनेचे मी स्वागत करते.

सभापती महोदय, जलसंधारणाची कामे करुन महाराष्ट्राची सिंचन क्षमता मोठया प्रमाणात वाढविली आहे. सिंचन क्षमता वाढविल्याशिवाय व कोरडवाहू क्षेत्र कमी केल्याशिवाय महाराष्ट्राचा विकास होणार नाही. त्यासंदर्भात मी शासनाचे अभिनंदन करते. त्या अनुषंगाने शेत तळी असतील, मोठे प्रकल्प असतील, छोटे प्रकल्प असतील, प्रकल्पांच्या दुरुस्तीची कामे असतील यासंबंधी महाराष्ट्र राज्याने मागील काही वर्षात केलेली कामगिरी अप्रतिम आहे. मराठवाडयाचा, विदर्भाचा अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने पॅकेजद्वारे मदत करण्याचा प्रयत्न झाला होता आणि याही वर्षी 1 हजार कोटी रुपये देवून अनुशेष कमी करण्याचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये केलेला आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, सेंद्रीय शेती हा जगातील कृषी क्षेत्राच्या अजेंडयावरील ऐरणीचा विषय आहे. शेतक-यांच्या बांधावरील काडीपासून कच-यापासून दुभत्या जनावरांच्या शेणापासून, अगदी अंडयांच्या टरफलापासून, शिंपल्यांपासून आणि गाईच्या शिंगापासून शेतकरी स्वत:च्या बांधावर सेंद्रीय शेती करु शकेल. यासंबंधीचे मी एक उदाहरण सभागृहाला देवू इच्छिते. बीड जिल्हयातील लोळद गावचे शेतकरी श्री.राजा घोडके यांना वर्षासाठी 2.5 लाख रुपयांचे शेतीसाठी खत लागत होते. परंतु आता ते खत विकत तर घेत नाहीच, उलट शेणापासून तयार केलेले 2 लाख रुपयांचे खत विकतात. शेतक-यांची अर्थव्यवस्था रासायनिक खतांचे भाव वाढल्यामुळे कोलमडलेली आहे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्याचाही उल्लेख केलेला आहे. शेतक-यांचे क्षेत्र वाढवून 1 लाख हेक्टरवर सेंद्रीय शेती करण्याची सुरुवात केलेली आहे. सेंद्रीय खताद्वारे

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतक-यांनी सेंद्रीय माल निर्माण केलेला आहे. मग सेंद्रीय ज्वारी, बाजरी, गहू, कडधान्य, फुले व फळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये पाठवून या मुक्त अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून आयातनिर्यातीत या महाराष्ट्रातील शेतक-यांनी पुढे जावे असा प्रयत्न महाराष्ट्र शासन जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहे. किटकनाशक वापरण्यासाठी खूप पैसा लागतो. त्याला पर्याय म्हणून दशपर्णी अर्क असेल, लिंबोणी अर्क असेल अशाप्रकारचे किटकनाशक वापरत आहेत, शेतक-याला 100 रुपये सुध्दा खर्च करावा लागत नाही. त्यालाही सरकार वेगळया प्रकारे सहकार्य करीत आहे. या योजनांना पाठिंबा देते आणि अभिनंदन करीत आहे. दुभत्या जनावरांच्या बाबतीत असेल, कृषी क्षेत्रातील विकासाचा दर 4 टक्क्यांवर आणण्याचा प्रयत्न असेल. देशाच्या इतिहासामध्ये यापूर्वी केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर कृषी विषयाच्या बातम्या ठळक पध्दतीने छापून आल्या नव्हत्या. परंतु माननीय श्री.शरद पवार हे देशाचे कृषी मंत्री झाले, माननीय डॉ.मनमोहन सिंग हे पंतप्रधान झाल्यानंतरचा इतिहास पहावा. शेतक-यांच्या प्रश्नासंबंधीच्या बातम्या संपूर्ण देशातील वर्तमानपत्रामध्ये पहिल्या पानावर छापून आल्या, या विषयाला मिडियाने सुध्दा ठळकपणे प्रसिध्दी दिली. केंद्र सरकारने देशाच्या बजेटमध्ये शेतीला प्राधान्य दिलेले आहे. देशामध्ये कृषीचाच विचार केला पाहिजे आणि हा देश कृषीचा विकासाचा दर वाढविणारा देश आहे असे संपूर्ण देशात चित्र निर्माण करण्यामध्ये माझ्या राज्याचा नेता आणि या देशाचे कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार आणि या देशाचे पंतप्रधान हे यशस्वी झालेले आहेत. त्यासाठी मी केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे अभिनंदन करते. संपूर्ण जगाच्या पाठीवर पहिल्यांदाच कृषी क्षेत्राची चर्चा झाली आहे. म्हणून विकासाचा दर वाढविण्याच्या सरकारच्या धोरणाला मी पाठिंबा देते.

सभापती महोदय, हे खरे आहे की, कारखाने आर्थिकदृष्टया सक्षम झाले पाहिजेत. या कारखान्यांना शासनाने पॅकेज दिले नसते, सरकारने पाठबळ दिले नसते तर राज्यातील विरोधी पक्षातील कारखाने आणि सत्ताधारी पक्षाचे कारखाने सुध्दा 10 रुपये किलोच्या भावाने विकले गेले असते. जगाच्या पातळीवर ज्या पध्दतीने साखर निर्मिती होत आहे ती पाहता साखर कारखानदारी

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे.....

व इतर कारखानदारी यासंबंधी घेण्यात आलेल्या निर्णयाचा देशातील साखर निर्मितीवर फार मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे माझा गरीब शेतकरी आणि कारखानदार हा जागतिक स्तरावर स्पर्धेत कसा उतरेल ? सध्या साखरेचे भाव उतरत आहेत, ऊसाचे भाव उतरत आहेत. माननीय श्री.शरद पवार हे केंद्रीय कृषी मंत्री असल्यामुळे राज्याने व केंद्र सरकारने कारखान्यांना पॅकेज देऊन सहकार्य केलेले आहे. त्यांनी कारखान्यांना जगविले आहे, शेतक-यांना जगविले आहे आणि त्यामध्ये काम करणारे ऊसतोड कामगार सुध्दा त्यांच्यामुळे जगले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रच नाही तर देशातील ऊस कारखानदार या सहकार्यामुळे जगले आहेत. आता या कारखान्यांनी पारंपरिक पध्दतीने साखरेचे उत्पादन करुन चालणार नाही. त्यांना जोडधंदा देण्याची आवश्यकता आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषाताई दराडे....)

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ येऊन जोरजोराने घोषणा देत असतात तर काही सन्माननीय सदस्य आपल्या आसना जवळील मार्गिकेमध्ये बसलेले असतात.)

जशी इथेनॉलची गरज आहे तशी वीज निर्मितीची गरज आहे. साखर कारखानदारांनी वीज निर्माण केली तर राज्यातील विजेचा तुटवडा कमी होण्यास मदत होईल, कारखानदारांना वेगळे उत्पन्न मिळेल, कारखाने सक्षम झाले तर शेतक-यांना चांगला भाव मिळेल आणि त्यावर जगणारा माझा शेतकरी चांगल्या पध्दतीने जगेल. अशा अनेक पर्यायामधील एक पर्याय म्हणून वीज निर्मिती प्रकल्पासाठी साखर कारखान्यांना मदत करण्याचे पाऊल राज्य शासन उचलणार आहे. मागील 10 वर्षाच्या काळामध्ये आपण एकही युनिट वीज निर्मिती करु शकलो नाही. एक वेळ परिस्थिती अशी होती की एन्रॉन प्रकल्पाबाबत विरोधकांनी बेफाम आरोप केले आणि महाराष्ट्रातून एन्रॉन प्रकल्प परत गेला. महाराष्ट्र अंधारामध्ये बुडाला. महाराष्ट्राला अंधारातून बाहेर काढण्यासाठी हे राज्य शासन या क्षेत्रात गुंतवणूक करुन वीज निर्मिती करण्याचा प्रयत्न करीत आहे. या सर्व प्रयत्नांना विरोधकांनी सकारात्मक पाठबळ द्यावे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये विजेचा काटकसरीने वापर कण्याबाबत जनतेला आवाहन करण्यात आलेले आहे. जनतेच्या सहभागातूनही आपण काही गोष्टी करु शकतो अशा प्रकारच्या प्रथा या राज्यामध्ये रुजविण्यामध्ये हे शासन यशस्वी झालेले आहे.

सभापती महोदय, मी मघाशी आयात निर्यात सुविधेच्या संदर्भात बोलले आहे. या क्षेत्रामध्येही महाराष्ट्रातील शेतकरी निश्चितपणे पुढे जात आहे. महाराष्ट्रामध्ये एमआरईजीएस लागू होत आहे. केवळ कर्मचारी आणि योजना असून चालत नाही. यावर्षी ज्या ज्या जिल्ह्यामध्ये एमआरईजीएस लागू झाली त्या जिल्ह्यातून पैसा परत गेला. याचे कारण असे आहे की, या योजनेची अंमलबजावणी करण्याची मानसिकता, त्या योजनेचे ज्ञान संबंधित कर्मचा-यांना आणि पंचायत राजमध्ये निवडून आलेल्या पंचायत समितीच्या सदस्यांना तसेच ग्रामपंचायतीच्या सदस्यांना आणि सरपंचांना नव्हते. म्हणून एमआरईजीएसची अंमलबजावणी कशी करायची या संदर्भात राज्य सरकारने 3 लाख कर्मचा-यांना पाठबळ देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

..2..

(श्रीमती उषाताई दराडे....)

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर कापूस पिकविला जातो, ऊसाचे उत्पादनही मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. शेतक-यांनी एका जातीचे वाण लावावे, गट पध्दतीने कापूस लावावा, सेन्द्रीय पध्दतीने कापूस लावावा, सेन्द्रीय पध्दतीने ऊस लावावा, ठिबक सिंचन करावे आणि आपले उत्पादन वाढवावे यादृष्टीने हे सर्व क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी महाराष्ट्र शासन चांगल्या पध्दतीने प्रयत्न करणार आहे. ही जी भूमिका या अभिभाषणामध्ये मांडलेली आहे त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते. गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, ठाणे हे आदिवासी जिल्हे आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये, आदिवासी आणि अनुसूचित जाती जमाती यांच्या कल्याणासाठी बजेटमध्ये मोठ्या प्रमाणावर तरतूद करुन त्यांना विकासाच्या प्रक्रियेमध्ये समपातळीवर आणण्याचा प्रयत्न राज्य शासन करीत आहे ही अभिनंदनीय बाब आहे. वसतिगृहांची संख्या वाढविणे, तेथील जेवणाचा दर्जा वाढविणे, स्कॉलरशीपमध्ये वाढ करणे, परदेशामध्ये शिकण्यासाठी जाणा-या विद्यार्थी-विद्यार्थीनीला सहकार्य करण्याची भूमिका घेणे या निश्चितच अभिनंदनीय गोष्टी आहेत.

भारत निर्माण आणि जल स्वराज या क्रांतीकारी योजना आहेत. महाराष्ट्र सरकार क्रांतीकारी योजना निर्माण करणारी खाण आहे. रोजगार हमी योजना महाराष्ट्र राज्याने निर्माण केली आणि ती देशपातळीवर गेली. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी ग्राम स्वच्छता अभियान सुरु केले. या अभियानाची देशपातळीवर अंमलबजावणी होत आहे. श्री. अजितदादा पवार हे जलसंपदा खात्याचे मंत्री आहेत. जलसंपदा मंत्र्यांनी आणि त्यांच्या खात्याने जलस्वराज योजना राबविण्याच्या बाबतीत देशपातळीवर महाराष्ट्राला वरच्या क्रमांकावर नेऊन ठेवले आहे. लोकसहभागातून राज्याचा आणि देशाचा विकास ही योजना राबविण्यामध्ये महाराष्ट्र अग्रेसर राहिलेले आहे. त्याचाच एक भाग म्हणून भारत निर्माण कार्यक्रम देखील लोकसहभागातून ग्रामीण भागामध्ये चांगल्या पध्दतीने पुढे जात आहे. या सर्व योजना राबवित असताना राज्यातील महिला बचत गटांना जल स्वराजमध्ये सामावून घेतले गेले, त्यांना प्रशिक्षण दिले गेले, त्यांच्या कमिट्या निर्माण केल्या गेल्या. भारत निर्माणमध्येही आपण तेच करीत आहोत. राज्यातील पिण्याच्या

..3..


MSS/ SBT/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 14:15
असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषाताई दराडे....)

पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत राज्य शासन यशस्वी पावले टाकीत आहे. वाडया, तांडे, वस्त्या, सर्व गावे, वाढलेली शहरे, शहरांमध्ये निर्माण झालेली उपनगरे, त्यांच्या वाढत्या गरजा, हे नवीन प्रश्न आपल्या समोर येत आहेत.

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री. शिगम 14:20

श्रीमती ऊषाताई दराडे....

( विरोधी पक्ष सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देत असतात. )

सभापती महोदय, पूर्वी शहरांतील लोकसंख्या कमी होती आणि ग्रामीण भागातील लोकसंख्या जास्त होती. परंतु आता ग्रामीण भागातील माणसे शहराकडे रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने येऊ लागला आहे. त्यामुळे मुंबईतील उपनगरे खूप वाढली आहेत. अशिया खंडात सगळयात जलद गतीने वाढणारे शहर म्हणून औरंगाबाद शहराचा नाव लौकिक आहे. अकोला, अमरावती, ठाणे, नाशिक या महानगरपालिका क्षेत्रात आणि नगरपालिका, नगरपरिषदा क्षेत्रात देखील मोठया प्रमाणात उपनगरे वाढत चालली आहेत. या उपनगरात राहणा-या कुटुंबियांच्या गरजा पुरविणे,त्यांना प्राथमिक सुविधा पुरविणे, नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे, आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे, शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे, आणि त्यांच्या हाताला काम देणे, त्यांना रोजगार निर्माण करुन देणे असे एक नवीन चित्र माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून दिसून येत आहे. या सगळया परिस्थितीचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील सगळे ज्वलंत प्रश्न सोडविण्यामध्ये महाराष्ट्र शासन अग्रेसर राहिलेला आहे.

सभापती महोदय, राज्यात ग्रामस्वच्छता अभियान राबविले जात आहे. राज्यातील महिलांनी हातामध्ये झाडू घेऊन गावात स्वच्छता ठेवण्याचे काम सुरु केले आहे. प्रत्येक घरातील मुलीने अथवा महिलेने हातात झाडू घेऊन आपले घर आणि आंगण स्वच्छ ठेवावे असे प्रत्येक कुटुंब प्रमुखानी शिकवण दिलेली आहे. परंतु स्वच्छतेच्या कामाला सुध्दा स्वच्छता अभियानाने प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. गावातील सरपंच, गावातील पाटील, गावातील ग्रामसेवक, गावातील तलाठी, आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच मंत्री यांना हातामध्ये झाडू घेऊन दूरदर्शन कॅमेरासमोर गावातील रस्ते साफ करण्याची ही अभिनव योजना या महाराष्ट्राने राबविली आणि म्हणून श्रमाला प्रतिष्ठा असते हे यावरुन सिध्द होते. कुठलेही काम कमी प्रतीचे नसते. कोणतेही काम लोकसहभागातून झाले तर ते कमी खर्चात होते. या योजनेमध्ये अर्थकारण आले, राजकारण आले. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील प्रत्येक गाव समृध्द झाले पाहिजे असे महात्मा गांधी यांचे स्वप्न होते. महात्मा गांधीच्या स्वप्नपूर्तीची सुरुवात या महाराष्ट्राने केली आहे. निर्मल ग्राम पुरस्कार मिळविण्यामध्ये, संपूर्ण स्वच्छता मोहिमेतील पुरस्कार मिळविण्यासाठी संपूर्ण तालुक्यातील 6011 ग्रामपंचायतींना आपण पाठविले आहे. त्यात तीन ग्रामपंचायतींचे प्रस्ताव

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती ऊषाताई दराडे....

पुरस्कारासाठी पुढे पाठविण्यात आले. या अभियानात एक नंबर मिळविला आहे. परंतु एक नंबरचा पुरस्कार मिळविणे असे टारगेट नाही. परंतु या योजनेला हत्यार बनवून शेवटचा शेतकरी, शेवटची भगिणी, बांधावरची भगिणी सक्षम होतील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, विमानतळाची योजना आहे, तशाच इतर अनेक चांगल्या योजना शासनाने सुरु केलेल्या आहेत. त्या योजनांचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. सुरेश देशमुख यांनी अतिशय चांगले विचार सभागृहात मांडले आहेत. त्यामुळे त्या योजनांच्या बाबतीत मी पुनरावृत्ती करणार नाही.

सभापती महोदय, आर्थिक क्षेत्राची बाब ही अतिशय महत्वाची आहे. महाराष्ट्रात 128 विशेष आर्थिक क्षेत्रास मान्यता मिळालेली आहे. विशेष आर्थिक क्षेत्रास मान्यता देताना शासन जमिनी संपादित करीत आहे. विशेष आर्थिक क्षेत्रासाठी ज्यांच्या जमिनी संपादित केल्या जाणार आहेत त्यांच्यावर अन्याय होणार नाही यादृष्टीने सरकार जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहे.

( विरोधी पक्ष सदस्य वेलमध्ये बसून घोषणा देत असतात. )

**तालिका सभापती ( श्री. उल्हास पवार )** : सन्माननीय सदस्या आपण ऑन लेग आहात. आपणाला बोलण्यासाठी पुन्हा संधी देण्यात येईल. अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे मला शक्य नसल्यामुळे सभागृहाची बैठक मी 30 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.23 ते 2.53 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय सभापती महोदय, सभागृहामध्ये आज विरोधी पक्षाच्या वतीने नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. केंद्र शासनाने 60 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी 5 एकपर्यंत शेती असलेल्या शेतकऱ्यांसाठी जाहीर केली. कर्जमाफी जाहीर झाल्यानंतरही विदर्भामध्ये आजपर्यंत 26 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. कालच मूर्तिजापूर येथे एका शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. म्हणजेच कर्जमाफी जाहीर झाल्यानंतर अजूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबलेले नाही. मध्यंतरी महाराष्ट्राचे मुख्यमंत्र्यांनी याबद्दल असमाधान व्यक्त केले आणि कोरडवाहू शेतकऱ्याला या कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही अशा पध्दतीचे स्टेटमेंट केले. यासंबंधात केंद्र सरकारला राज्य सरकारने पत्र लिहिल्याचेही त्यांनी सांगून टाकले आहे. तरीसुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. म्हणून याविषयावर सविस्तर चर्चा करुन महाराष्ट्र शासनाचे मत केंद्र सरकारला योग्य पध्दतीने पाठविण्याबाबत सदनामध्ये आम्ही विचार मांडणार होतो आणि सरकारला याबाबत सूचना करणार होतो. यामध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण नव्हते. केवळ एका बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी बोलून कर्जमुक्तीच्या विचाराला व्यापक स्वरुप देता येणार नाही यासंबंधीचे विचार मांडणार होतो. सभापती महोदय, आपल्याही दालनात यासंबंधी चर्चा झाली. परंतु आमच्या म्हणण्याला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. दिवसभराचे सर्व कामकाज बाजूला सारुन याविषयावर चर्चा झाली असती तर उद्या कदाचित शेतकऱ्यांपर्यंत चांगला मेसेज जाऊन भविष्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या असत्या. परंतु सरकारने कामकाज दाबून नेण्याचे ठरविलेले दिसते. अशा पध्दतीने आमची मागणी असताना व आपण सभापतीस्थानी नसताना तालिका सभापतींना सभापतीस्थानी बसवून विरोधी पक्षाला वाऱ्यावर सोडले हे मी आपल्याला नम्रतापूर्वक सांगू इच्छितो. आम्ही आजच्या दिवसाच्या कामकाजामध्ये कोणत्याही पध्दतीने भाग घेऊ इच्छित नाही म्हणून सभागृहाच्या आजच्या कामकाजावर आम्ही बहिष्कार टाकतो आणि सभागृहातून निघून जातो.

( विरोधी पक्षाचे सदस्य सभागृहातून बहिर्गमन करतात )

श्री.भास्कर जाधव : माननीय सभापती महोदय, विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी अशा प्रकारचा शब्दप्रयोग वापरला की, सभापतीस्थानी तालिका सभापतींना बसवून विरोधी

.....2

श्री. भास्कर जाधव .....

पक्षाला पूर्णपणे वाऱ्यावर सोडून सभागृहाचे कामकाज दाबून नेण्याचा प्रयत्न केला त्यामुळे आम्ही सभात्याग करतो. सभापती महोदय, चुकीचे वक्तव्य रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी याठिकाणी उभा आहे. याबाबतची पार्श्वभूमी मी आपणांस निदर्शनास आणून देऊ इच्छितो. त्यांचे वक्तव्य प्रेसपर्यंत पोहोचविण्याची पध्दतशीर व्यवस्था केलेली आहे. विरोधी पक्षाच्या वतीने नियम 289 अनुसार प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. नियम 289 अनुसार हा प्रस्ताव कसा होत नाही हे माननीय सभापतींनी व्यवस्थितपणे सांगण्याचा प्रयत्न केला. माननीय सभापती असेही म्हणाले की, या विषयावरील चर्चा नियम 97 खाली घ्यायला मी तयार आहे. त्यावेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आग्रह धरला की, ही चर्चा नियम 97 खाली न घेता नियम 289 खाली घेण्यात यावी. शेतकऱ्यांच्या बद्दल निश्चितपणाने सगळयांनाच चिंता आहे. नियम 289 खाली चर्चा घेण्याची तयारी आहे फक्त चर्चेची वेळ ठरविण्यासाठी माननीय सभापतींनी विरोधी पक्ष नेत्यांना आणि गटनेत्यांना दालनात चर्चेसाठी बोलाविले. माननीय सभापतींनी सर्व बाजूने याठिकाणी विरोधी पक्षांचे म्हणणे ऐकून घेतलो आहे. शेतकऱ्यांच्या प्रती कणव,कळवळा आणि चिंता आहे याची जाणीव ठेवून माननीय मुख्यमंत्री सदनात उपस्थित होते. त्यांनीही सांगितले की शेतकऱ्यांच्या बाबतीत आपण नेहमीच चर्चा करतो.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 15:10

श्री.भास्कर जाधव.........

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबद्दल चर्चा झालीच पाहिजे. परंतु केंद्र शासनाने जे धोरण जाहीर केले त्याबद्दलचा सविस्तर आराखडा अद्याप आमच्या हाती आलेला नाही. तो आराखडा आमच्या हाती येऊ द्यावा. त्यामध्ये ज्या काही उणिवा असतील, त्रुटी असतील त्या दूर करण्यासाठी तुम्ही-आम्ही सर्व मिळून प्रयत्न करु असा सहानुभूतीचा विचार दाखवून सुध्दा विरोधी पक्षाला पूर्णपणे आलेले नैराश्य, विरोधी पक्षाची दिसून आलेली हतबलता याठिकाणी व्यक्त होत आहे. विरोधी पक्षाला कळून चुकले आहे की, 60 हजार कोटी रुपयांची मदत 4 कोटी शेतकऱ्यांना मिळणार असल्यामुळे आमच्या हातातील राजकीय भांडवल निघून गेले आहे, प्रचाराचा मुद्दा निघून गेला आहे त्यामुळे यापुढे काय बोलावे, कोणत्या तोंडाने बोलावे अशा प्रकारची हतबलता, अशा प्रकारचे आलेले नैराश्य लपविण्यासाठी म्हणून विरोधी पक्षाने केलेला हा कांगावा आहे असे माझे मत आहे. म्हणून सन्माननीय सभापती महोदयांबद्दल जे वक्तव्य करण्यात आले आहे ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे अशी माझी मागणी आहे.

**उपसभापती** : तपासून पाहिले जाईल आणि उचित कार्यवाही केली जाईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

(चर्चा पुढे सुरु..........

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला समर्थन देत असताना याठिकाणी मला महाराष्ट्रातील दळणवळणाचा उल्लेख करावयाचा आहे. महाराष्ट्रातील औद्योगिक विकास आणि सर्व पध्दतीचा विकास व्हावा म्हणून गावे, वाड्या, तांडे याठिकाणी सर्व प्रकारचे महामार्ग चांगल्या पध्दतीने करण्याचा, त्यामध्ये दुरुस्ती करण्याचा, रुंदीकरण करण्याचा प्रयत्न या महाराष्ट्र शासनाने केलेला आहे. रेल्वेच्या संदर्भात सुध्दा महाराष्ट्र राज्याने अत्यंत पुरोगामी अशी भूमिका घेतली आहे. केंद्राचे रेल्वे खाते 100 टक्के खर्चाचा भार उचलेल. ज्याठिकाणी 100 टक्के भार उचलण्याची तयारी नाही अशा ठिकाणच्या रेल्वेमार्गासाठी 50 टक्के अधिभार राज्याने उचलण्याची तयारी दाखविली त्याबद्दल माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री आणि शासनाचे मी अभिनंदन करते.

सभापती महोदय, बीड जिल्हयामध्ये नगर-बीड-परळी हा रेल्वेमार्ग पूर्वीच मंजूर झाला आहे. दरवर्षी 10 कोटी रुपयांची तरतूद होते. त्यामुळे बीड जिल्हयातील सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी आणि नागरिकांनी केंद्र व राज्य शासनाकडे ही अपेक्षा व्यक्त केली की, महाराष्ट्रामध्ये इतर रेल्वेमार्गाप्रमाणे 50 टक्के अधिभार राज्याने उचलावा. या संदर्भात काही बैठका या राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांनी लोकप्रतिनिधींसमवेत घेतल्या. केंद्र सरकारशी त्या संदर्भात पत्रव्यवहार देखील केलेला आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य निश्चितपणे पावले उचलल्याशिवाय राहणार नाही. सन्माननीय रोहयो मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील आणि रोहयो राज्यमंत्री श्री.राणा जगजितसिंह पाटील यांच्याशी बीड जिल्हयातील लोकप्रतिनिधींच्या बऱ्याच बैठका झाल्या. रोहयो मार्फत बीड जिल्हयातील रेल्वेमार्गाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न व्हावा. बीड जिल्हा हा मागासलेला, ऊसतोड कामगारांचा, बालाघाटातील, भटक्या विमुक्त जातींची अधिक लोकसंख्या असलेला, रेल्वेमार्ग नसल्यामुळे दरडोई विकास कमी होत असलेला जिल्हा आहे. म्हणून आम्ही या रेल्वेमार्गाची अग्रहक्काने मागणी करीत आहोत. सभागृहासमोर आलेला हा प्रश्न असल्यामुळे तो केंद्राशी निगडित प्रश्न राहिलेला नसून महाराष्ट्र राज्याचाही हा प्रश्न आहे ही

..3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे.........

भूमिका नजरेसमोर ठेवून पावले उचलण्यास सुरुवात केली याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री आणि राज्य शासनाचे अभिनंदन करते. नजिकच्या काळात या संदर्भातील 50 टक्के अधिभार राज्य शासनाने उचलावा आणि भविष्यकाळात सोलापूर-बीड-जालना असा रेल्वेमार्ग तयार करावा अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करते.

सभापती महोदय, महाराष्ट्र हा महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, अहिल्याबाई होळकर, राजमाता जिजाऊ या सर्वांचा वारसा सांगणारा, वारकरी संप्रदायाचा महाराष्ट्र आहे. खरे म्हणजे पुरुषप्रधान संस्कृती, या संस्कृतीतून महिलांना दिलेले दुय्यम स्थान यामधून महिलांचा आत्मविश्वास वाढविणे, परिवर्तनाची चळवळ पुढे नेत महिलांचे सक्षमीकरण करुन देशाच्या विकासात महिलांना पुढे नेण्यासाठी प्रयत्न केला. या राज्याने सन्माननीय श्री.शरदचंद्रजी पवार हे मुख्यमंत्री असताना पंचायती राज्याची अंमलबजावणी केली, मंडल आयोगाची अंमलबजावणी केली, महिलांना वारसा हक्क मिळण्यासाठी कायद्यात दुरुस्ती केली. देशाचे संरक्षणमंत्री असताना महिलांना वैमानिक करण्याचा, महिलांना कोर्ट फी माफीचा निर्णय घेतला. महिला सक्षमीकरणाचा सातत्याने प्रयत्न केला. ऑल इंडिया वुमेन्स रिसर्च सेंटरवर सुध्दा महाराष्ट्रातील दोन महिलांना प्रतिनिधी म्हणून पाठविले आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे .......

आणि म्हणून राज्य शासनाने या सर्व बाबतीत कृती करीत असतांना मी अशीही अपेक्षा व्यक्त करीत आहे की, महिला सक्षमीकरणाची योजना एक अनुभव म्हणून प्रायोगिक तत्वावर फक्त काही तालुक्यातच हाती घेतली आहे. त्यात बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यात ही योजना हाती घेतलेली आहे. परंतु महिला सक्षमीकरणाबाबतचे धोरण अधिक व्याप्तीने सरकार घेईल व त्यासाठी अधिक तरतूद करील. खऱ्या अर्थाने काम करणाऱ्या महिलांचा सहभाग योग्य दिशेने देण्याच्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकण्यात येईल यादृष्टीने शासनाने कार्यवाही करावी, अशी मी अपेक्षा व्यक्त करते.

महोदय, शासनाने तंटामुक्त योजना राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आणि हा निर्णय खरोखरच सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा आहे. या योजनेमध्ये माणसांची मने खऱ्या अर्थाने जुळली. कारण केवळ आपसातील भांडणांमुळे गावाचा विकास होत नाही. कारण मॅनपॉवर, पाणी, जमिनी, योजना आणि पैसा आहे तरी देखील त्याची अंमलबजावणी किरकोळ भांडणांमुळे होत नाही व त्याचा परिणाम म्हणून न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या दिवसेदिवस वाढत जाते. ही प्रकरणे तातडीने निकाली काढण्याच्या दृष्टीने शासनाने कौटुंबिक न्यायालये स्थापन केली, न्यायाधीशांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न केले तसेच लोक न्यायालयांच्या मदतीने ही प्रकरणे कमी करण्याचे देखील प्रयत्न केले आहेत. अशा प्रकारे प्रकरणांची संख्या कमी करीत असतांना तंटामुक्त योजनेच्या माध्यमातून न्यायालयापर्यंत प्रकरणेच येणार नाहीत अशा प्रकारे शासनाने ही योजना सुरु करुन महत्वाचे प्रयत्न सुरु केले आहेत. म्हणून या सर्व योजनांचे मला अभिनंदन करावेसे वाटते. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत सुध्दा या योजनेची आपल्याला दखल घ्यावी लागेल. ज्या ज्या वेळी मुंबईत तसेच राज्यात असे प्रसंग निर्माण झाले त्या त्या वेळी आपले राज्य यातून सहीसलामत सुटले. खरे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता तसेच धर्मनिरपेक्षतेचे पालन करणारे तसेच घटनेचा सन्मान करणारे राज्य म्हणून आपले राज्य आघाडीवर आहे. या राज्यातील प्रत्येक नागरिक हा देशचा नागरिक आहे आणि येथे मात्र भूमीपुत्र आणि प्रांतीयवाद अशा प्रकारचा वाद निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहे. अशा परिस्थितीतही आपले राज्य राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात यशस्वी झालेले आहे. महाराष्ट्र पुरोगामी असे राज्य आहे, त्यामुळे या राज्यात सर्वांना समान जगण्याची तसेच सर्वांना समान विकास करण्याची संधी मिळेल.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे .....

अशा प्रकारे प्रत्येक प्रश्न अत्यंत चांगल्या प्रकारे सोडविण्याचा प्रयत्न राज्यशासन यशस्वी ठरले असून कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने तंटामुक्त गांव योजनेकडे आपल्याला बघावे लागेल. मी आजच वर्तमानपत्रात बातमी वाचली की संत तुकाराम महाराजांचा मुकूट सापडला.......

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे या ऑन लेग राहतील. आता उर्वरित कामकाज आहे असेच ठेवून आपण सभागृहाचे काम येथेच स्थगित करु या...

श्री. कपिल पाटील : महोदय, मी सकाळी 289 अन्वये प्रस्ताव दिला होता, त्यावेळी माननीय सभापतींनी आदेश दिल्यानुसार माननीय शिक्षण मंत्र्यांनी आजच निवेदन करणार म्हणून सांगितले होते. त्यानुसार माननीय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन देखील तयार आहे. कृपया हे निवेदन सभागृहात त्यांना करण्याची परवानगी द्यावी व नंतर सभागृहाचे कामकाज स्थगित करावे. कारण हजारो शिक्षकांचा हा प्रश्न आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, वस्ती शाळांच्या शिक्षकांच्या संदर्भात यापूर्वीच मंत्रिमंडळापुढे मी एक नोट सादर केली आहे. यात प्रामुख्याने दोन प्रश्न अंतर्भुत आहेत. एक म्हणजे या वस्ती शाळांच्या नियमितीकरणाचा आणि दुसरा प्रश्न त्यातील शिक्षकांचा. या दोन्ही प्रश्नांच्या संदर्भात कॅबिनेटसमोर जो प्रस्ताव सादर केला त्यावर चर्चा करण्यात येईल. हा प्रस्ताव निश्चितच अनुकूल असाच आहे म्हणून यादृष्टीने चांगला विचार करण्यात येईल.

**उपसभापती** : माननीय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन तयार असेल तर ते त्यांनी करावे.

.......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वस्ती शाळातील शिक्षकांनी दिलेला आमरण उपोषणाचा इशारा.

**मु.शी.**: वस्ती शाळातील शिक्षकांनी दिलेला आमरण उपोषणाचा इशारा यासंबंधी सर्वश्री श्रीकांत जोशी व रामनाथ मोते यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री श्रीकांत जोशी व रामनाथ मोते यांनी वस्ती शाळातील शिक्षकांनी दिलेला आमरण उपोषणाचा इशारा या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)**

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, मुख्य प्रश्न असा आहे की, ज्या 8081 शिक्षकांनी गेली 7 वर्षे अतिशय तुटपुंज्या वेतनावर म्हणजे हजार दीड हजार रुपयांवर काम केलेले आहे त्यांना आपण बेदखल करीत आहात. या प्रश्नाच्या संदर्भात कोणतेही आश्वासन माननीय शिक्षण मंत्र्यांनी दिलेले नाही. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय तीन अधिवेशनापासून कॅबिनेटपुढे जात आहेत. त्यामुळे आम्हाला आता ठोस आश्वासन मिळण्याची आवश्यकता आहे. आज आम्ही जो नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता त्याच्यामागील आमची हीच भूमिका होती. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात शिक्षण मंत्री नेमके कोणते निवेदन करणार आहे हा आमच्या समोर मुख्य प्रश्न आहे. या 8081 शिक्षकांना सेवा शाश्वती मिळणार आहे की, नाही याबाबत माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर द्यावे अशी विनंती आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, सेवा शाश्वती मिळण्याच्या संदर्भात सकारात्मक भूमिका घेऊन कॅबिनेटला नोट सादर केलेली आहे. या विषयाच्या संदर्भात कायदेशीर बाबी तपासून कॅबिनेटला निश्चितच अनुकूल निर्णय घेण्याची विनंती करु.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदया, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी उल्लेख केला आहे की, आम्ही या विषयाच्या संदर्भात कॅबिनेट पुढे जाऊ आणि जाणार आहोत. परंतु जे 8000 शिक्षक आहेत त्यामध्ये काही अनट्रेन्ड आहेत तर काही ट्रेन्ड शिक्षक आहेत. ट्रेन्ड शिक्षकांनाच सामावून घेतले जाणार आहे की, ज्यानी 7-7, 8-8 वर्षे काम केलेले आहे त्या सगळया शिक्षकांना सामावून घेणार आहात ? कॅबिनेट पुढे आपण नेमके कोणते धोरण घेऊन जाणार आहात ? यासंदर्भातील माहिती सभागृहाला माननीय मंत्री महोदयांनी द्यावी अशी विनंती आहे.

श्री. जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदया, आपण आज या शिक्षकांना तुटपुंज्या पगारावर सेवेत घेतलेले आहे. आज हे शिक्षक उपाशीपोटी आंदोलनाच्या पवित्र्यात आलेले आहेत. या प्रश्नाचे गांभीर्य माननीय शिक्षणमंत्र्यांनी ओळखून आज माननीय मंत्रीमहोदयांनी ठोस आश्वासन दिले तर आम्हाला जाऊन त्यांना सांगता येईल की, "बाबाहो तुम्ही काही काळजी करु नका सरकार तुमची काळजी घेत आहे." या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी जे उत्तर या ठिकाणी दिलेले आहे त्यातून आमचे काहीही समाधान झालेले नाही. दुसरा मुद्दा असा आहे की, जे शिक्षक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी.एल.ऐनापुरे....

अनट्रेंड आहेत त्यांना वेगळे करण्यापेक्षा, ट्रेन्ड आणि अनट्रेन्ड असा फरक करण्यापेक्षा जे अनट्रेन्ड शिक्षक आहेत त्यांना घेतलेले आहे. अशा शिक्षकांना पोस्टाद्वारे, निरनिराळया योजनांद्वारे ट्रेन्ड करुन त्यांना सेवेतच ठेवावे, नाही तर ट्रेंन्डसाठी वेगळा कायदा आणि अनट्रेन्डसाठी वेगळा कायदा असे केले तर त्यांच्यामध्ये फूट पडेल, अडचणी निर्माण होतील. त्यामुळे या शिक्षकांचे नुकसान होणार नाही याची खबरदारी माननीय मंत्रीमहोदयांनी घ्यावी अशी विनंती आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, वस्तीशाळेच्या शिक्षकांच्या संदर्भात शासनाने गांभीर्याने सकारात्मक भूमिका घेतलेली आहे. यामध्ये काही कायदेशीर बाबी सुध्दा तपासण्याची गरज आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, उमादेवी विरुध्द कर्नाटक सरकारचा सुप्रिम कोर्टाचा निर्णय घातक ठरलेला आहे. तरी सुध्दा कॅबिनेटने या विषयाच्या संदर्भात मानवतेच्या भूमिकेतून सकारात्मक निर्णय करावा अशी आम्ही कॅबिनेटला विनंती करणार आहोत.

श्री. वसंत पवार : सभापती महोदय, वस्ती शाळेतील जे शिक्षक आहेत त्यांना केवळ हजार रुपये मानधन दिले जाते. या तुटपुंज्या मानधनामुळे त्यांची फार मोठी अवहेलना होत आहे. जे शिक्षक ट्रेन्ड आहेत किंवा ज्यांना कंडीशनली अप्रुव्ह केलेले आहेत अशा सर्वांना शिक्षण सेवकाचा दर्जा देण्यात काही हरकत नाही असे मला वाटते. कारण हे शिक्षक आता सुध्दा ज्ञानदानाचे काम करीत आहेत. त्यामुळे या शिक्षकांना सामावून घेणे गरजेचे आहे. या सगळया शिक्षकांना आपण जे मानधन देतो ते सुध्दा योग्य नाही. त्यामुळे या शिक्षकांना कमीतकमी 3 हजार रुपये मानधन मिळणे गरजेचे आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी कॅबिनेट पुढे जाऊन 3 हजार रुपये मानधन देण्याचे मंजूर करुन घ्यावे अशी मी आपल्या माध्यमातून मागणी करतो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, डी.एड. शिक्षकांची संख्या जास्त आहे. त्यांना अप्रशिक्षीत वेतनश्रेणी देऊन सरकार त्यांना सेवेत घेणार आहे काय ? या डि.एड. शिक्षकांना आंतरवासियता काळासाठी 3 हजार रुपये मानधन दिले जाणार आहे काय ? या ठिकाणी जी सूचना डॉ. साहेबांनी केली त्याही पेक्षा अप्रशिक्षीत शिक्षण सेवकाची वेतनश्रेणी मिळाली तर ते अधिक सक्षम राहतील व त्यांना सेवेत घेतल्याचा फायदा होईल व पुढील 3 वर्षात सेवाअंतर्गत प्रशिक्षण पूर्ण करुन त्यांना नियमित करुन घेता येईल. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.......

कर्नाटकच्या बाबीचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. परंतु मध्येप्रदेश सरकार, राजस्थान सरकार, कनार्टक सरकार या सर्व राज्यांनी सर्व वस्ती शाळा शिक्षकांना कायम सेवेत घेतलेले असून 5 हजार रुपयांचे वेतन अप्रशिक्षीत असून सुध्दा दिलेले आहे. त्या राज्यातील वस्ती शाळा शिक्षकांची संख्या किती तरी पटीने आपल्या पेक्षा जास्त आहे. केवळ हे महाराष्ट्र सरकार स्वत:ला पुरोगामी म्हणवते, शिक्षणात पुढे आहे असे सांगते परंतु आज महाराष्ट्र सरकार प्रत्येक घटकात मागे आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 15.25

श्री.कपिल पाटील ...

कायदा तपासून पाहण्यात आणि बाबी तपासून पाहण्यात वेळ जात असल्यामुळेच आपण मागे पडत आहोत. या निमित्ताने मी जे दोन तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्याबाबतीत माननीय शिक्षण मंत्री नेमका खुलासा करतील काय ?

श्री.दिलीपराव सोनावणे :सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला जोडूनच मला असा असे सांगावयाचे आहे की,. वस्तीशाळा शिक्षकांचा हा महत्वाचा प्रश्न आहे. वाडी आणि वस्तीमध्ये राहणारे जे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात अशा विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम हे शिक्षक करीत असतात. या शिक्षकांना अनेक गैरसोयींना तोंड द्यावे लागत आहे. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारे सेवा शाश्वती नसल्यामुळे अतिशय गंभीर स्वरुपाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी आपण तरतूद करीत आहात परंतु त्याही पेक्षा त्यांना काही तरी मानधन देण्याचा निर्णय घेतला पाहिजे. सन्माननीय सदस्य डॉ. वसतराव पवार यांनी सांगितल्या प्रमाणे या शिक्षकांना शिक्षण सेवक म्हणून सामावून घेतले तर अधिक संयुक्तिक होईल त्याचप्रमाणे काही विद्यार्थी शाळाबाहय राहतात तेव्हा हे विद्यार्थी शाळाबाहय राहू नयेत यासाठी तो एक चांगला तोडगा होऊ शकेल. त्यामुळे काम करणाऱ्या व्यक्तीला संधी मिळेल आणि शाळाबाहय जे विद्यार्थी आहेत ते खऱ्या अर्थाने शिक्षण घेऊ शकतील असे मला वाटते. म्हणून या शिक्षकांना पूर्ण पगार दिला जावा किंवा आज शिक्षण सेवकांना जो पगार दिला जातो तो जर या शिक्षकांना दिला तर अधिक चांगले होईल. या शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय आपल्याला करता येईल परंतु त्यापूर्वी त्यांना सेवा शाश्वती द्यावी व त्यांना शिक्षण सेवक म्हणून घ्यावे अशी मी या निमित्ताने सूचना करतो.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदया, हा विषय पुन्हा पुन्हा चर्चिला जाऊ नये म्हणून तो मी गांभीर्याने घेतलेला आहे. रेग्युलर शिक्षकांपेक्षा सुध्दा वस्ती शाळेतील शिक्षकांनी तन्मय होऊन, एकरुप होऊन समरस होऊन काम केलेले आहे. हे देखील मी मान्य केलेले आहे. म्हणून मानवतेच्या दृष्टीकोनातून या शिक्षकांना सामावून घेण्याच्या दृष्टीने एक समिती गठीत करण्यात आली होती. कोणाला सामावून घ्यावे, त्याचे निकष काय असावेत, त्यांना कोणते वेतन द्यावे, कोणाला कसे प्रशिक्षण द्यावे या बाबतीत या समितीने एक अहवाल तयार करुन तो अहवाल सादर करण्यात आला आहे. शिफारस करणारी जी समिती होती त्यांनी काय शिफारशी केल्या आहेत

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याची माहिती संपूर्णपणे सादर करण्यात आलेली आहे. त्यातील महत्वाचे मुद्दे सर्वांच्या समोर आहेत. या विषयाचे कोणीही भांडवल करण्याचे कारण नाही. कोणत्याही शिक्षक प्रतिनिधीपेक्षा मी हा मुद्दा फार गांभीर्याने घेतला आहे. या शिक्षकांना कायम करण्यासाठी काय केले पाहिजे तसेच त्यांच्या इंटर्नशीपच्या बाबतीत काय केले पाहिजे हा महत्वाचा मुद्दा आहे. तेव्हा या शिक्षकांना स्टायपेंड मिळेल अशी मी ग्वाही दिली आहे आणि तो मुद्दा देखील मी कॅबिनेटला सादर करत आहे. या ठिकाणी केवळ आश्वासन देऊन चालणार नाही तर कॅबिनेटने त्याला मान्यता देणे महत्वाचे आहे. या शिक्षकांचे मानधन वाढविण्याच्या संदर्भात देखील माझा मुद्दा आहे.एवढेच नव्हे तर एकदा त्यांना शिक्षक म्हणून सामावून घेण्यात आल्यानंतर त्यांना प्रशिक्षण देणे हा एक युनिक पार्ट आहे. या शिक्षकांच्या संदर्भात अनेक मुद्दे आहेत .तेव्हा या ठिकाणी मी संपूर्ण कॅबिनेटची नोट वाचून दाखववयाची काय ? हा देखील महत्वाचा मुद्दा आहे. या शिक्षकाच्या संदर्भातील सर्व मुद्दे मी अतिशय गांभीर्याने घेतलेले आहेत. यापूर्वी देखील हा मुद्दा कॅबिनेट समोर आल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचना केली होती की, शाळांचे रेग्युलरायझेशन करुन घेतले पाहिजे आणि या शिक्षकांचा समावेश करुन घेतले पाहिजे. तेव्हा हा महत्वाचा मुद्दा राहिला होता म्हणून शाळांचे रेग्युलरायझेशन करुन घेणे आणि या शिक्षकांचा समावेश करुन घेणे हे दोन्ही मुद्दे मी कॅबिनेट समोर सादर करणार आहे आणि यामध्ये मला निश्चितपणे यश येईल याची मला खात्री आहे.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदया, निवेदनाच्या शेवटी असे म्हटलेले आहे की, " माननीय सर्वोच्च न्यायालयाने हंगामी/कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित करता येत नाही असा निर्णय दिलेला असल्याने या स्वयंसेवकांना शासन सेवेत सामावून घेणे अशक्य झालेले आहे. " मला असे सांगावयाचे आहे की या शिक्षकांना हंगामी किंवा कंत्राटी न म्हणता त्यांना रेग्युलर सर्व्हिसमध्ये घेण्याचा आदेश दिला आणि त्यानंतर त्यांना पगार देण्याचे ठरविले तर सुप्रीम कोर्टाची अडचण येणार नाही. तेव्हा अशा प्रकारे करण्यात येणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके :सभापती महोदया, ही बाब कायदेशीररीत्या तपासून घेण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदया, गेल्या तीन अधिवेशनामध्ये हा प्रश्न आम्ही सातत्याने सभागृहामध्ये मांडत आहोत. या वस्तीशाळेमध्ये जे शिक्षक काम करतात त्यांच्या प्रश्ना बद्दल

3..

श्री.कपिल पाटील ...

कोणाचेही दुमत नाही परंतु तरी सुध्दा प्रत्येक वेळी कायदेशीर बाब तपासून पाहण्यात येईल असे उत्तर दिले जाते. ही बाब लवकर तपासून पाहण्यासाठी शासनाला कोणते कायदे तज्ज्ञ हवे आहेत.? शासनाने वेळ खाऊपणाचे धोरण स्वीकारु नये. एका बाजूला असे सांगण्यात येते की, या शिक्षकांना नोकरीत सामावून घेण्याचा अहवाल तज्ज्ञ समितीने दिला आहे. परंतु निवेदनात असे म्हटलेले आहे की," माननीय सर्वोच्च न्यायालयाने शासन सेवेतील पदांवर हंगामी/कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित करता येत नाही असा निर्णय दिलेला असल्याने या स्वयंसेवकांना शासन सेवेत सामावून घेण अशक्य झालेले आहे. ". अन्य राज्यातील शिक्षकांना वेगळया पध्दतीने नोकरीत सामावून घेतले जाऊ शकते परंतु आपल्याकडे मात्र केवळ कागदी घोडे नाचवून या शिक्षकांना उपाशी ठेवणे ही बाब शासनाला कितपत शोभते ?. माननीय शिक्षण मंत्र्यांच्या राळेगाव या मतदारसंघात श्री. मेश्राम नावाच्या एका शिक्षकाने आत्महत्या केली आहे. त्या शिक्षकाला 70 वर्षाची वयोवृध्द आई आहे आणि त्या शिक्षकाला कोणतीही सेवा शाश्वती दिली गेली नाही, नियमित पगार दिला जात नाही म्हणून कर्जबाजारी होऊन त्याने आत्महत्या केली होती. अजून किती शिक्षकांनी आत्महत्या केल्यानंतर शासन निर्णय घेणार आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांनी आजच्या आज निर्णय द्यावा अन्यथा या प्रश्नाचा स्फोट होईल. अशा प्रकारे केवळ एक दोन गावातच हे शिक्षक आहेत असे नाही तर आठ हजार गावात असे शिक्षक आहेत. तेव्हा त्यांच्या बाबतीत त्वरित निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदया, या शिक्षकांची आपल्याला गरज होती तेव्हा आपण त्यांना नेमणुका दिल्या. त्या नेमणुका देत असताना त्यांची पात्रता तपासूनच आपण त्यांना नेमणूक दिलेली आहे. म्हणून आज ते अपात्र आहेत असे आपल्याला कदापि म्हणता येणार नाही. त्यामुळेच आता आज आपले काम भागले आहे म्हणून त्यांना घरी पाठवा असा प्रकार होणार आहे. आता या निवेदनात आपण म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने शासन सेवेतील पदावर हंगामी/कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित करता येत नाही असा निर्णय दिलेला असल्याने या लोकांना आपल्याला कायम वा नियमित करता येत नाही. परंतु आता येथे उपप्रश्नाला दिलेल्या उत्तरात माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, या बाबत अभ्यासगटाने शिफारस केलेली आहे आणि त्याप्रमाणे आपण कारवाई करू. तेव्हा आता ही समस्या गंभीर होत चालली आहे. काही शिक्षक आत्महत्या करू लागले आहेत. शेतकऱ्यांप्रमाणे आता या शिक्षकांनाही नैराश्याने ग्रासले आहे. या शिक्षकांच्या आत्महत्याच्या दोन घटना या राज्यात घडलेल्या आहेत. तेव्हा ही संख्या 10-20-100 झाल्यानंतर याचे गांभीर्य आपल्या लक्षात येणार आहे आणि नंतर आपण निर्णय घेणार आहात का ? म्हणून तातडीने याबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन हे जे सगळे 8 हजार शिक्षक काम करतात त्या सगळ्यांना आपण सेवेत सामावून घेतले पाहिजे. त्यात जे कोणी अनट्रेंड असतील त्यांना आपल्याला नंतरही ट्रेंड करता येऊ शकेल. यापूर्वीही अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे. तेव्हा त्याप्रमाणे आपण लवकरात लवकर या शिक्षकांबाबत निर्णय घ्यावा अशी आपल्याला विनंती आहे.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने इस प्रश्न के बारे में निवेदन किया है कि सुप्रिम कोर्ट के जजमेंट के अनुसार कॉन्ट्रॅक्ट और कॅजुअल लेबर को रेगूलराइज नहीं कर सकते तो यह बात इस संदर्भ में उपयुक्त नहीं है. हमारा महाराष्ट्र राज्य दूसरे राज्यों से ज्यादा प्रोग्रेसिव है, ऐसा हम लोग समझते हैं. इसलिए जिन लोगों को आपने रेगूलराइज प्रोसस से लिया है, उनको नहीं हटाएंगे, ऐसी गारन्टी माननीय मंत्री महोदय को देनी चाहिए. यह बात ठीक है कि सुप्रिम कोर्ट के निर्णय के अनुसार टीचर्स इस प्रकार की मांग नहीं कर सकते, लेकिन अगर सरकार उनको ट्रेन्ड और अन-ट्रेन्ड टीचर्स के रुप में लेना चाहती है तो उसके लिए सुप्रिम कोर्ट की तरफ से कोई अड़चन नहीं है. हमारा महाराष्ट्र प्रोग्रेसिव स्टेट है

. . . CC 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जामा

और जब दूसरे स्टेट ऐसा कर सकते हैं तो मेरा माननीय मंत्री महोदय से निवेदन है कि इनका केरियर ग्रोथ न रुके इसलिए टेक्नीकल अड़चन को बाजू में रखकर इन लोगों को जल्दी से जल्दी ट्रेन्ड और अन-ट्रेन्ड टीचर्स के रुप में रेगूलराइज करना चाहिए.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, अभ्यंकर समितीचा खुलासा आपण कॅबिनेटपुढे आणणार आहात का या एकाच प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, मी एकच गोष्ट किती वेळा सांगावी ? जी समिती आम्ही गठित केली आहे त्या समितीने त्या काही शिफारशी केल्या आहेत त्या संदर्भातच आम्ही मंत्रिमंडळापुढे जाणार आहोत आणि त्या संदर्भात काही कायदेशीर सल्ला देखील घेणार आहोत जेणे करून नंतर काही कायदेशीर अडचणी उद्भवणार नाहीत. मात्र यामध्ये न्याय मिळावा हीच सरकारची भूमिका आहे हे मला आपल्याला आवर्जून सांगावेसे वाटते.

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करते की, आपण माझ ो ऐकून घ्यावे. मी आपल्याला सांगू इच्छिते की, यामध्ये तीन गोष्टी आपल्यासमोर आलेल्या आहेत. एक म्हणजे अभ्यासगटाच्या शिफारशी, दुसरी गोष्ट म्हणजे न्यायालयाचा निवाडा आणि तिसरी गोष्ट म्हणजे महाराष्ट्र शासनाने घ्यायची भूमिका. या तिन्ही बाबींचा सुसंगतपणे विचार करता, न्यायालयाची जी काही भूमिका असेल आणि जो काही विषय आता येथे चर्चिला गेला आहे ते या प्रकरणाला लागू होतात की नाही ? ....

( यानंतर श्री. सरफरे .... डीडी 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**....

तेव्हा अभ्यास गटाच्या शिफारशींचा अभ्यास करण्यासाठी व या प्रकरणी विधी व न्याय विभागाचा सल्ला घेऊन निर्णय घेण्याकरिता आपण या सभागृहाला निश्चित कालमर्यादा सांगावी.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, शिक्षकांना सेवेमध्ये सामावून घेण्याचा निर्णय अवैध ठरु नये याकरिता ही बाब तपासून घेण्यासाठी विधी व न्याय विभागाचे मत जाणून घेतले पाहिजे.

**तालिका सभापती** : यासंबंधी विधी व न्याय विभागाचा सल्ला किती दिवसात घेण्यात येणार आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, लवकर घेण्यात येईल. त्याचप्रमाणे कॅबिनेट नोट सुध्दा तयार करण्यात आली असून मंत्रिमंडळाच्या येत्या दोन-तीन बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात येईल.

**तालिका सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 13 मार्च, 2008 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 36 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 13.3.2008 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

******

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही